शिक्षक पुस्तीका

घटक 1

"मुले महत्वपूर्ण आहेत कडून"रविवार शाळा

Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत

# काळ यंत्र

## येशू चालला तेथे चाला



# शिक्षक पुस्तीका

सर्व वयांसाठी

# काळ यंत्र




रविवार शाळा

“मुले महत्वपूर्ण आहेत” ह्यांच्या कडून

शिक्षक पुस्तीका

सर्व वयांसाठी

घटक 1: धडा1-13

संकेत स्थळ: www.ChildrenAreImportant.com/machine/

‘मुले महत्वपूर्ण आहेत’ च्या संपूर्ण चमूचे आभार"

**Founders, Dwight y Kristina Krauss**
**Creative Team Manager, Flor Boldo**
**Creative Editorial Team, Jennifer Sánchez, Areli Salinas, Ramón Martínez, Marlon Hernández.**
**Designer, Julio Sánchez**
**Contributing Designer Suzanna Kangas (Suki)**
**Consulting Emeritus, Miguel y Vickie Kangas**
**Facebook Page Spanish Admin, Ramón Martínez and Verónica Toj**
**Facebook Page English Admin, Marlon Hernández and Flor Boldo**

**Translation Team, alineviera, Annupama Wankhede, Anton Klymyk, Araz Mammadzadeh, Aroma Publications and Media, Arturo Jr Boron, Blessy Jacob, Carmela Dawn Flores, Chrisbresnahan, David Raju, Ephraim Njuguna Mirobi, Finny Jacob, Geenav, HamidReza Azimi (hamid.azimi1364 at gm#ail com), Heyaudrey, I-clever.com, iqbalman, Jacob Kuruvilla, kamilturk, Karunguru Mwangi, kiran, Maitrayi Mondal, Marco Chu, Marcos Rocha, Mathew Das, Mitesh Mandaliya, mrramlama, Mrs.Geethashree NavaneethaKrishnan, Nassim Bougtaia, nicbenk, Paul Mwangi, Paul Septan, Rana922, Rubina Rai, Safdar Khan, shahroshan15, Talento-Unido, ueritom, Verdia Juliansyah Cancerika, Yeoh Jung Chin, Zeina Mirella Barzaga Arencibia**

# प्रस्तावना

**काळ यंत्र रविवार शाळेत स्वागत आहे! हा नवीन व रोमांचक कार्यक्रम आहे, आपण येशूचे जीवन पाहण्यासाठी वेळेत मागे जाणार आहोत! दर आठवडयात, मुले मजेशीर नाटक, एक खेळ, विद्यार्थी पुस्तकात कोडे सोडविणे आणि नविन हजेरी कार्ड गोळा करणे हयाची मजा घेणार आहेत.**
**3 किंवा अधिक अभिनेत्यासाठी मजेशीर नाटकं तयार केलेले आहेत जे येशूचे जीवन पाहण्यासाठी काळात मागे जाणार आहेत. पात्रांची ओळख करून घेणे व ते काळात मागे जात असतांना संख्या मोजणे हे मुलांना आवडेल. परंतू ते केवळ मनोरंजन नाही. प्रत्येक नाटकात, पात्र विद्यार्थ्यां सारखेच धडे शिकतात आणि त्या धडयाचे आधुनिक लागूकरण दाखवितात.**
**हया कार्यक्रमात, मुलं येशूच्या जीवनाचे अनुसरण करतील आणि आधुनिक समाजामध्ये न्यायाबद्दल शिकतील. इतरांवर प्रिती करणे आणि इतरांना योग्य वागणूक देणे ही अशी गोष्ट आहे ज्याची देव खूप पर्वा करतो. हया बद्दलच्या अनेक वचनांपैकी एक वचन हे आहे:**
**"चांगले करण्यास शिका, नीतीच्या मागे लागा, जुलम्याला ताळयावर आणा, अनाथांचा न्याय करा, विधवेचा कैवार घ्या.' यशया 1:17**
**काही समस्या जसे की मानव तस्करी ही आता बदलण्यासाठी, मुलांच्या क्षमतेच्या पलिकडे आहे. परंतू, आपण मुलांमध्ये जागतिक दृष्टीकोन निर्माण करू शकतो, जसे की सामाजिक स्थीती शिवाय लोकांना सन्मानाने वागविणे, जेणे करून ते मोठे झाल्यावर जे छळलेले त्यांचा बचाव करू शकतील. न्याया बद्दल शिकण्यासाठी मुलांना मदत करण्यासाठी तीन विभाग निर्माण केलेले आहेत. 1. 'न्याय' विभाग हा मुख्य धड्यावर आधारीत आधुनिक लागूकरण आहे. उदाहरण: सर्व लोकांना देवाची निर्मीती हया दृष्टीने पाहणे. 2. गृहपाठ विभाग मुलांना ते जे शिकले त्याचे लागूकरण त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये करण्याची परवांगी देतो. उदाहरण: एखाद्या व्यक्तिला आभाराचे पत्र लिहा. 3. आत्मचरित्र विभाग मुलांना विविध व्यवसायांबद्दल व ते सामाजाला कशी मदत करतात हे शिकवितात, जसे पाळक, वकील, वैज्ञानिक, आणि पोलीस. हया विभागातील काही व्यवसायांकडे काही देशांमध्ये नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते कारण काही व्यक्ति त्यांच्या अधिकाराच्या जागेचा दुरुपयोग करतात. एखाद्या व्यक्तिने काय करावे किंवा येशूने त्या जागी काय केले असते हे मुलांना शिकविण्याची ही तुमची संधी आहे. कोणास ठाऊक? कदाचित तुमच्या वर्गातील एक विद्यार्थी मोठा झाल्यावर त्या व्यवसायात जाईल आणि तो योग्य ते करेल आणि स्वत:च्या अधिकाराचा गैरफायदा घेण्या ऐवजी इतरांच्या भल्यासाठी कार्य करेल. ते त्यांच्या सामाजात किंवा त्यांच्या देशात येशूसाठी प्रकाश म्हणून चमकतील.**
**शिक्षकांनो धैर्य धरा, कारण देव तुमच्या बरोबर आहे. तो जग बदलू इच्छितो, आणि पुढील पिढींना प्रशिक्षित करणे हया पेक्षा दुसरा चांगला मार्ग नाही! देव तुमच्या मुलांच्या मनामध्ये कार्य करून त्यांना त्यांच्या आजूबाजूच्या लोकांवर भेदभाव न करता प्रिती करण्यासाठी मदत करील तेव्हा तुमच्या समाजामध्ये काय होऊ शकतं हयाची कल्पना करा. मुलांना शिकविण्याच्या हया महत्वाच्या कार्यामध्ये सेवा केल्या बद्दल देव तुम्हाला भरपूर आर्शिवाद देईल अशी आम्ही प्रार्थना करतो.**
**मुले महत्वपूर्ण आहेत समूह**



# दृष्टिक्षेप

1

## राजेशाही की दीनता ?

**बेथलेहामाला प्रवास करणे: लूक 2:1-5**

1 पेत्राचे 2:9 पण तुम्ही तर 'निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र,' देवाचे 'स्वत:चे लोक' असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले 'त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत.'

2

## महान मित्र

**योसेफ मरीये बरोबर लग्न करतो: मत्तय 1:18-25**

याकोबाचे पत्र 4:11 बंधूंनो, एकमेकांविरुद्ध बोलू नका. जो बंधूविरुद्ध बोलतो व आपल्या बंधूला दोषी ठरवतो तो नियमाविरुद्ध बोलतो व नियमाला दोषी ठरवतो; आणि जर तू नियमाला दोषी ठरवतोस तर तू नियम पाळणारा नव्हेस, न्यायाधीश आहेस.

3

## राजेशाही की दीन जन्म?

**येशूचा जन्म: लूक 2:4-20**

करिंथकरांस दुसरे पत्र 8:9 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहीत आहे; तो धनवान असता तुमच्याकरता दरिद्री झाला, अशा हेतूने की, त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे.

4

## कठिण काळ

**येशूचे कुटुंब मिसर देशात गेले: मत्तय 2:13-23**

इफिसकरांस पत्र 4:32 आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा.

5

## असाधारण येशू

**मंदीरामध्ये येशू: लूक 2:41-51**

याकोबाचे पत्र 1:19 माझ्या प्रिय बंधूंनो, तुम्हांला हे कळते. तर प्रत्येक माणूस ऐकण्यास तत्पर, बोलण्यास धीमा, रागास मंद असावा.

6

## महान सुरवात

**येशूचा बाप्तिस्मा: मत्तय 3:13-17**

इब्री लोकांस पत्र 13:17 आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणांस हिशेब द्यायचा आहे हे समजून ते तुमच्या जिवांची राखण करतात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे; तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही.

## 7 संघाची निवड करणे

**येशूने 12 शिष्यांना बोलाविले: मत्तय 4:18-22, योहान 1:35-50**

योहान 8:12 पुढे येशू पुन्हा त्यांना म्हणाला, "मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणारच नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील."

## 8 येशू पूरवठा करतो

**पाण्याचा द्राक्षरस: योहान 2:1-11**

लूक 6:38 "द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल; चांगले माप दाबून, हलवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील; कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला परत मापून देण्यात येईल."

## 9 येशू सारखी प्रिती करा

**चांगला शमारोनी: लूक 10:25-37**

लूक 10:27 त्याने उत्तर दिले, "तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने व संपूर्ण बुद्धीने 'प्रीती कर;' आणि 'जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर."'

## 10 देव ते पुरेसे करतो

**5000 रांना जेवण: मत्तय 14:13-21**

मत्तय 19:26 येशूने त्यांच्याकडे न्याहाळून पाहून म्हटले, "माणसांना हे अशक्य आहे, 'देवाला' तर 'सर्व शक्य आहे'."

## 11 देवावर विश्वास असणे

**येशू वादळाला शांत करतो: लूक 8:22-25**

अनुवाद 31:8 तुझ्यापुढे चालणारा परमेश्वरच आहे; तो तुझ्याबरोबर असेल; तो तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणारही नाही; भिऊ नकोस व कचरू नकोस."

## 12 येशू कोण आहे?

**तुम्ही मला कोण म्हणून म्हणता? मत्तय 16:13-20**

योहान 3:16 देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

## 13 येशू सामर्थ्य प्रदर्शित करतो

**लाजर: योहान 11:32-44**

योहान 11:25 येशूने तिला म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल;

# हया साहित्याचा उपयोग करा करावा

## नाटक (भाग 1)




प्रत्येक नाटकामध्ये 'न्याय समूह' येशूच्या जीवनाचा काही भाग पाहण्यासाठी काळामध्ये मागे जातो जिथे समूहातील सदस्य समांतर धडा शिकतात आणि त्यांच्या आधुनिक जीवनात त्याचे लागूकरण करतात. प्रत्येक नाटकाचा काही भाग मुख्य धडयाच्या आधी लिहिलेला आहे, जिथे ते काळात मागे जातात आणि नाटकाचा दुसरा भाग मुख्य धडयाच्या नंतर येतो, जेव्हा पात्र परत येतात आणि जे काही ते शिकले त्याचे लागूकरण करतात. नाटकं 3 पात्रांसाठी रचलेले आहे तर, पुढारी, तपासक, आणि प्रतिनिधी. इतर दोन पात्र कामगार आणि तंत्रज्ञ हे ऐच्छिक आहेत जर तुमच्याकडे अधिक स्वयंसेवक असतील तर .

## मुख्य धडा

सुरवातीच्या नाटकानंतर मुख्य धडा येतो. पवित्र शास्त्रातील गोष्टी धडयामध्ये पूर्ण लिहिलेल्या नाहीत, म्हणून पवित्र शास्त्रातून गोष्ट वाचण्यास विसरू नका.

## नाटक (भाग 2)

मुख्य धडया नंतर नाटकाचा दुसरा भाग पूर्ण करा, जिथं समूह जे ते शिकले त्याचा संभ्रम सोडवितात.

## न्याय

मुख्य धडयासोबत हया लहान विभागाची उजळणी करा, विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडवितांना किंवा फराळ खातांना.

## जीवन चरित्र

जीवन चरित्र विभाग मुलांना विविध व्यवसायांबद्दल आणि ते सामाजाचा कसा फायदा करतात ह्या बद्दल शिकविते, आत्मचरित्र विभाग मुलांना विविध व्यवसायांबद्दल व ते सामाजाला कशी मदत करतात हे शिकवितात, जसे पाळक, वकील, वैज्ञानिक, आणि पोलीस. हया विभागातील काही व्यवसायांकडे काही देशांमध्ये नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते कारण काही व्यक्ति त्यांच्या अधिकाराच्या जागेचा दुरउपयोग करतात. एखाद्या व्यक्तिने काय करावे किंवा येशूने त्या जागी काय केले असते हे मुलांना शिकविण्याची ही तुमची संधी आहे. कोणास ठाऊक? कदाचित तुमच्या वर्गातील एक विद्यार्थी मोठा झाल्यावर त्या व्यवसायात जाईल आणि तो योग्य ते करेल आणि स्वत:च्या अधिकाराचा गैरफायदा घेण्या ऐवजी इतरांच्या भल्यासाठी कार्य करेल. ते त्यांच्या सामाजात किंवा त्यांच्या देशात येशूसाठी प्रकाश म्हणून चमकतील. सुरवातीला लहानसा खेळ खेळून ते अधिक मजेशीर बनवा. कोणालातरी त्या व्यवसायाचा अभिनय करू द्या आणि तुम्ही सांगण्याआधी मुलांना ते ओळखू द्या.

## पाठांतर वचन

प्रत्येक पाठांतर वचन धडयाला लागू होतं. पाठांतर मजेशीर करण्यासाठी एखादा खेळ किंवा कृती करण्याचा विचार करा.

## विद्यार्थी पुस्तकं

विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडविणे मुलांना आवडेल. शब्द शोधा आणि चित्र रंगविणे हे प्रत्येक धडयावर अधिक भर देण्यासाठी मदत करतील. शब्द शोधातील शब्दाची चर्चा करा, जसे मोल, नम्रता आणि न्याय आणि मुलांना विचारा की त्या शब्दांचा त्यांच्यासाठी काय अर्थ आहे.

## प्रश्न आणि उत्तरं मोठया विद्यार्थ्यांसाठी

प्रौढांच्या जगामध्ये जीवन गुंतागुंतीचे आहे. जर कठिण समस्यांचे उत्तरं देण्यासाठी कोणीतरी नेहमी आपल्या जवळ असले तर आपल्या आवडेल नाही का? परंतू सहसा ते नसतात आणि आपण जितकं शक्य होईल तितकं आपल्या स्वत:च्या निष्कर्षां पर्यंत पोहचलो पाहिजे. मोठे विद्यार्थी सुध्दा प्रौढ होत आहेत. आणि आपण रविवार शाळेमध्ये एवढंच करतो की त्यांना सर्व गोष्टींसाठी 'बरोबर उत्तरं' सांगतलं आणि कठिण प्रश्न टाळले, तर ही गोष्ट त्यांना अप्रशिक्षित ठेवते आणि त्यांना गोष्टींचा पूर्ण विचार करता येत नाही आणि पवित्र शास्त्रामधून स्वत: उत्तरं शोधता येत नाहीत. हया मुळे जेव्हा त्यांचा सामना हया कठिण प्रश्नांशी होते ते भ्रमित आणि हरवलेले असतात आणि केवळ कॉलेज मधील प्राध्यापक आणि बॉस ह्यांचे ऐहिक उत्तरं ऐकतात. त्या ऐवजी हया भागाचा उपयोग मोठया मुलांना गंभीर विचार करण्याचा सराव करण्यासाठी करा. मोठया मुलांमध्ये चर्चा सुरू करा. त्यांना 'बरोबर उत्तर' देऊ नका, परंतू त्यांना स्वत: चांगल्या निष्कर्षा पर्यंत पोहचण्यासाठी सौम्य पणे मदत करा. शिक्षकांसाठी मार्गदर्शन म्हणून आम्ही हया कठिण प्रश्नांचे काही उत्तरं पूरविली आहेत.

## खेळ

मुलांबरोबर खेळ खेळा! मुलांसाठी खेळ खूप महत्वाचे आहेत, ते त्यांना सामाजिक कौशल्य विकसित करण्यासाठी मदत करतात. शिवाय, ते मजेशिर असतात! जेव्हा मुलं त्यांच्या मित्रांना तुमच्या वर्गात आमंत्रित करतात तेव्हा मुलांना येऊन येशू बद्दल एकण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी हे चांगले साधन आहे.

## गृहपाठ कार्य

पवित्र शास्त्र सांगते की जर आपण वचन ऐकतो परंतू त्याचे लागूकरण करत नाही तर त्याचा काही उपयोग नाही. याकोब 1:22-25. जे काही ते शिकले त्याद्वारे काही तरी करून देवाच्या वचनाचे लागूकरण त्यांच्या दैनंदिन जीवनात करण्यासाठी मुलांना प्रशिक्षित करा. ज्या मुलांनी मागील आठवडयाचा गृहपाठ पूर्ण केला त्यांना एखादे चॉकलेट किंवा लहान बक्षीस देऊन प्रतिफळ देण्यासाठी काही मिनिट घ्या.

## कार्ड

ह्या कार्डांचा उपयोग उपस्थितीसाठी मोबदला देण्यासाठी करा. प्रत्येकावर समोर गंमतीशीर डिझाइन आहे आणि मागील बाजूस पाठांतर वचन आहे.

## वेळापत्रक

सुरवात
- स्वागत
- गीत

नाटक आणि धडा
- नाटक भाग 1
- धडा
- नाटक भाग 2

कृती

विद्यार्थी पुस्तक किंवा फराळ अशा इतर कृती करतांना जीवनचरित्र व न्याय विभाग करा .
- पाठांतर वचन
- विद्यार्थी पुस्तक
- प्रश्न व उत्तरे (मोठ्या विद्यार्थ्यांसाठी)
- खेळ (ऐच्छिक)

समाप्ती
- गृहपाठ
- हजेरी कार्ड

# राजेशाही की दीनता?

01



## बेथलहेमला प्रवास करणे: लूक 2:1-5

### नाटक भाग एक

प्रतिनिधी न्याय समूहाचा भाग होतो आणि पुढारी व तपासकाला पहिल्या वेळेस भेटतो. पुढारी न्याय समूहाच्या भूमिकेचे थोडक्यात वर्णन करतात: काळ यंत्रासह वेळेत मागे जाऊन येशूच्या जीवनाचा प्रथम दर्शी तपास करणे आणि न्यायाच्या उदाहरणांचा आणि आधुनिक युगात येशूला अनुसरण्याचा तपास करणे. प्रतिनिधी पुढारी व तापसक हयांची काळ प्रवास मोहीमेत मदत करील. आजची मोहीम येशूच्या आईवडीलांना भेटणे आणि ते राहत होते ती जागा व समाज पाहणे आहे. पुढारी कार्य नियंत्रकाला इशारा करतो (एकतर दुसरा अभिनेता किंवा मंचा बाहेरील काल्पनिक व्यक्ति) आणि तापसक व प्रतिनिधी ह्यांच्या बरोबर काल यंत्रामध्ये चढतो. ह्या वेळेस सर्व नाटकांमध्ये शक्य असल्यास काळ यंत्र हलवा आणि प्रवास कालावधीसाठी आवाजाचा प्रभाव द्या. मुख्य धडा शिकवा आणि ह्या पात्रांना नाटकाच्या भाग 2 साठी परत येवू द्या.

### धडा 1

तरूण जोडप्याने लांब, गरम, धुळीने भरलेल्या रस्त्याने प्रवास केला. त्यांच्या देशातील राजा म्हणाला की, 'प्रत्येकाने आपआपल्या कुळातील गावी मोजणीसाठी जावे. म्हणून ते पाच दिवसांच्या प्रवासासाठी त्यांच्या वडिलांच्या गावी बेथलहेमला जाण्यास निघाले. तिथे गाडया, बस, विमानं किंवा सायकली सुध्दा नव्हत्या, म्हणून ते पायीच गेले. कदाचित त्यांच्याकडे गाढव असेल परंतू बहुदा ते चालत गेले. होवू शकतं की अनेक लोक पायी चालत होते.

योसेफ आणि मरीया तरूण होते ज्यांची मागणी झाली होती व त्यांचे लग्न होणार होते. ते श्रीमंत नव्हते. योसेफाचा सुताराचा व्यवसाय होता आणि मरीया कवळ एक तरुण मुलगी होती. त्यांच्या बद्दल विशेष दिसण्यासारखं काहीही नव्हतं.

परंतू मरीया व योसेफ हे विशेष होते. दोघेही इस्राएलचा जुना राजा दावीद ह्याचे वंशज होते. हे अतिशय महत्वाचे आहे कारण दावीद महान राजा होता आणि 'देवाच्या मनासारखा माणूस' म्हणून ओळखला जात होता. ह्याचा अर्थ असा होता की योसेफ व मरीया दोघेही राजघराण्यातील होते कारण त्यांचे पूर्वज हे राजे होते. त्यांच्या पैकी एक जण किंवा त्यांचे मुलं हे कायद्यानुसार राजा होवू शकत होते! परंतू ह्या वेळेस इस्राएल कडे स्वत:चा राजा नव्हता. त्यांच्या वर कैसर नावाच्या दुस-या राजाची सत्ता होती, ज्याची मागणी होती की त्यांना बेथलेहेम गावी प्रवास करावा.

हे खरोखर छान असं आहे कारण जुने संदेष्टे जे देवासाठी बोलत होते त्यांनी सांगितले की मसीहा म्हटलेला नविन राजा बेथलहेम गावी जन्मास येईल. हे दावीदाचे शहर आहे आणि हे लोक दावीदाचे वंशज आहेत.

म्हणून मंच तयार आहे. राजघराण्यातील रक्त असलेले एक जोडपे त्या जागी जात आहे जिथं नविन महान राजा जन्मास येईल. हा योगायोग नाही परंतू देवाने योजलेली अद्भूत गोष्ट आहे.

तर मग ते सर्वसाधण होते की राजकिय लोक होते? ते दोन्ही होते!

देवाची इच्छा आहे की आपणही त्याचे मुलं व्हावे! वास्ततिक ह्यासाठीच देवाने येशूला पृथ्वीवर पाठविले, ह्यासाठी की आपल्यासाठी देवाचे मुलं व मुली होणं शक्य व्हावे! तुम्ही देवाचे मूलं आहात का? तुम्ही देवाला 'पिता' म्हणून हाक मारू शकता का?

### पाठांतर वचन 1

1 पेत्राचे 2:9 पण तुम्ही तर 'निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र,' देवाचे 'स्वत:चे लोक' असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले 'त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत.'

### नाटक (भाग दोन)

धडा झाल्यावर, पुढारी तपासक आणि प्रतिनिधी वेळ यंत्रानी वर्तमान काळात परत येतात. ते त्यांनी जे पाहिले त्याची चर्चा करतात: मरीया योसेफ सर्वसाधारण दिसत होते आणि इतर कोणापेक्षा वेगळे दिसत नव्हते. हे आश्चर्यकारक आहे की ते इतिहासात प्रसिध्द असलेले व्यक्ति बनले आणि देवाने त्यांना त्यांच्या पुत्राची काळजी घेण्यासाठी निवडले. प्रतिनिधी इतरांना सांगतो की तो दुस-यांसोबत चांगला वागत नाही, परंतू आता त्याच्या लक्षात आले आहे की ज्या प्रत्येक व्यक्तिला तो भेटतो, त्या व्यक्तिला देवाच्या दृष्टीने भरपूर मोल आहे.

### न्याय 1


दीन परिस्थितील लोकांना कमी हक्क किंवा इतरांपेक्षा कमी मोल आहे असा विचार करणे सोपे आहे. परंतू सर्व लोक हे देवाची निर्मीती आहे आणि तो प्रत्येक व्यक्तिला मोल देतो आणि त्यांना येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाची मुले व मुली होण्याचा मार्ग देतो.

### जीवनचरित्र (पिता 1)

कुटुंबाची काळजी घेणे ही पित्याची प्राथमिक जवाबदारी आहे. ह्याचा अर्थ मुलांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी आईची मदत करणे एवढंच नव्हे तर त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मार्ग शोधणे. त्याच्या प्रत्येक मुलांच्या विशेष गरजांबद्दल तो सर्तक असला पाहिजे जेणे करून तो व आई मिळून त्या अद्वीतीय कौशल्यांचा विचार करण्यासाठी कार्य करू शकतील.

*जवाबदा-या:* पित्याने वैयक्तिक प्राधान्य व इच्छा बाजूला ठेवणे शिकले पाहिजे त्यांच्या कुटुंबाच्या गराजांवर त्याचे जीवन केंद्रित करणे शिकले पाहिजे. आई सहसा मुलांबरोबर सरळ सरळ काम करते म्हणून पिता ह्या बाबतीत मोठी मदत करू शकतो, आणि ह्याही बाबतीत जागरूक राहू शकतो की तो आईला भावनिक आणि शारीरिक रित्या कशी मदत करू शकतो. पित्याने हे लक्षात घेतले पाहिजे की त्याची नोकरी आणि त्याच्या जीवनातील निवडी केवळ त्याच्यावर परिणाम करत नाहीत तर आई व मुलांवरही परिणाम करतात.

*संधी:* आपल्या कुटंबाला फलदायी जीवनाकडे जाण्यास गती देण्याची विशेष संधी पित्याकडे आहे. स्तोत्र 127:4-5 *प्रमाणे, तरूणपणातले पुत्र हे वीराच्या हातांतील बाणांप्रमाणे आहेत, ज्या पुरूषाचा भाता अशांनी भरला आहे तो धन्य!* अब्राहामाचा पिता तेरह, (उत्पत्ती 11:31) ह्याला त्याच्या कुटुंबासाठी कनान मध्ये चांगल्या गोष्टींचे दृष्टांत झाले. त्यांने सभ्यतेचा पाळणा उर सोडले जे आणि त्या ठिकाणी गेला जिथे त्याने शहर बांधले. परंतु त्याचा मुलगा अब्राहाम ह्याचे मन वचनदत्त देश कनान कडे प्रवास करण्याच्या बाबतीत अधिक खुले होते. पिता त्याच्या भविष्यातील पिढयांवर भरपूर प्रभाव टाकू शकतो.



## प्रश्न व उत्तरं 1

मी देवाचे मूल आहे हे मी कसे जाणू शकतो? (मुलांना योहान 1:12-13 हे वचन वाचण्यासाठी मार्गदर्शन करा आणि त्यांना त्यावर चर्चा करण्यासाठी वेळ द्या.)

जर मी चूका केल्या तर मी माझ्यासाठी देवाचे जे आर्शीवाद ते गमावू शकतो का? (होय..... असे लोक आहेत जे आपलं सर्व काही गमावून बसले आहेत कारण त्यांची मूल्ये चूकीची होती, परंतू असेही लोक आहेत जे त्यांच्या आर्शीवादासाठी लढले!)

देवाला माझ्याकडून काय हवे आहे? (आपल्या देवाकडून वेगवेगळे दानं व क्षमता मिळाल्या आहेत, देव आपणा सर्वांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे वापरू शकतो, ह्या जगाला त्याचे गौरव दाखविण्यासाठी आणि त्याच्यासाठी अधीक लोकां पर्यंत पोहचण्यासाठी. आपल्या दानांच्या व्यतिरिक्तही देव आपला उपयोग करू शकतो, कधी कधी तो आपल्या कमजोरीतून त्याची महानता दाखवू इच्छितो. तो आपल्या तयार असलेले हृदय आणि तो जे आपल्याला करायला लावतो त्या बद्दल आपण तयार आहोत कि नाही ह्याची अधिक पर्वा करतो.)


योसेफ व मरीया हयांना ज्या शहरात जावे लागले त्याचे नाव काय? (बेथलहेम)

योसेफ व मरीया ह्यांच्या काळात ट्रेन होती का? (नाही, केवळ गाढवांनी ओढलेल्या गाडया होत्या किंवा घोडे आणि उंट सुध्दा होते.)

## कोड्यांची उत्तरे 1










## खेळ 1

*पोत्यांची शर्यत*

मोठे पोते जे बटाटे ठेवण्यासाठी वापरतात ते किंवा असे काही तरी जे भाग घेणारे त्यांच्या पायां सभोवती धरू शकतील आणि सुरवात रेषे पासून समाप्ती रेषे पर्यंत त्यांनी त्यात उडया माराव्या. ह्याचा संबंध पवित्र शास्त्रातील गोष्टीशी जोडा सुरवातीच्या रेषेला गालील म्हणा आणि शेवटच्या रेषेला बेथलहेम म्हणा. जर खूप मुलं असतील तर काही सहभागींना चांगल्या वागणूकिसाठी बक्षीस म्हणून निवडा. तुम्ही मुलांना गटातही विभागू शकता आणि रिले शर्यत घ्या.






## गृहपाठ 1

**तुम्ही कोणत्या 5 प्रकारे सर्वसाधारण व्यक्ति आहात आणि देवाच्या कुटुंबात आहात म्हणून कोणत्या 5 प्रकारे राजकिय आहात ह्याची यादी तयार करा. उदा. शहरात कोणालाच माझे नाव माहीत नाही. देव मला ओळखतो आणि त्याने माझे नाव जीवनी पुस्तकात लिहिले आहे.**

# एक महान मित्र

02



### योसेफ मरीये बरोबर लग्न करतो: मत्तय 1:18-25

#### नाटक (भाग एक)

प्रतिनिधी तपासकाला अफवा सांगतो की त्यांचा पुढारी काळ यंत्राच्या कार्यप्रणालीमध्ये चांगला नाही. आता ते येशूच्या जीवनातील गोष्ट पाहण्यासाठी काळ यंत्रामध्ये चढत असतांना थोडे संशयी आहेत की ते आताच्या काळामध्ये परत येऊ शकतील की नाही.

#### धडा 2

योसेफासमोर मोठी समस्या होती. तो मरीया नावाच्या एका मुली सोबत वागदत्त होता आणि तिला बाळ होणार होते. परंतू सर्वांना माहीत होते की केवळ ज्यांचे लग्न झाले आहेत त्यांनाच केवळ बाळ होऊ शकत होते. योसेफाने ठरविले की तो गुपचुप मरीये सोबतची त्याची मागणी तोडून टाकेल जेणे करून तिला दुःख होणार नाही. परंतू नंतर योसेफाला एक स्वप्न पडले ज्यात देवाच्या दूताने तला सांगितले की त्याने मरीये सोबत लग्न करण्यासाठी घाबरू नये कारण तिचे बाळ देवाकडून होते. आणि बाळाचे नाव येशू ठेवावे कारण तो लोकांना त्यांच्या पापापासून सोडविल. म्हणून योसेफाने तसे केले.

योसेफ मरीयेचा किती महान मित्र होता! त्यांने मरीये संबंधी उत्तम विचार केला आणि तिच्या पाठीशी उभा राहिला. कधी जे वाईट तुम्ही केले नाही त्याचा आरोप तुमच्यावर लागला काय? किंवा जे सत्य नाही अशी अफवा तुमच्या बद्दल सुरू झाली काय? आशा वेळेस तुमच्यावर विश्वास ठेवाणारा किंवा तुमचा बचाव करणारा मित्र असणे किती चांगले असेल नाही काय?

सोशल मिडियावर नीचपणा करणे किंवा समाजामध्ये चुगली करणे सोपे आहे. बरेच खोट आरोप आणि अफवा सुरू केल्या जातात आणि पसरविल्या जातात. आणि ह्या गोष्टी व्यक्तिला खूप दुःखी करू शकतात.

तुम्ही दुस-या कोणाचे तरी चांगले मित्र होऊ शकता! लोकांबद्दल अफवा किंवा चुगली स्वीकारू नका. त्या ऐवजी खरा मित्र बना. ज्या लोकांवर चूकीचे आरोप केले जातात त्यांच्याबाजूने उभे रहा. दुस-या व्यक्तिबद्दल नकारात्मक गोष्टी पोस्ट करू नका. नकारात्मक पोस्ट कधीच पुढे पाठवू नका.

येशू मध्ये आपल्याला अशा प्रकारचा मित्र आहे. 1 योहान 2:1, सांगतं येशू नेहमी पित्याबरोबर आहे आणि आपल्याबद्दल चांगल्या गोष्टी बोलतो.

#### पाठांतर वचन 2

याकोबाचे पत्र 4:11 बंधूंनो, एकमेकांविरुद्ध बोलू नका. जो बंधूविरुद्ध बोलतो व आपल्या बंधूला दोषी ठरवतो तो नियमाविरुद्ध बोलतो व नियमाला दोषी ठरवतो; आणि जर तू नियमाला दोषी ठरवतोस तर तू नियम पाळणारा नव्हेस, न्यायाधीश आहेस.

#### नाटक (भाग दोन)

मुख्य धडया नंतर, जेव्हा ते वर्तमान काळात परत येण्याची तयारी करत आहेत तेव्हा काळ यंत्र बिघडते आणि काम करणं थांबविते. प्रतिनिधींना माहित नाही की काय करावे, परंतू पुढारी मशीनच्या मागे चढतो आणि काही यंत्रने वर काम करतो जेणे करून ती काम करू लागते. वर्तमान काळात परत येत असतांना, दोन्ही प्रतिनिधींच्या लक्षात येते की त्यांच्या पुढा-या बद्दल जी अफवा होती त्यावर त्यांनी संशय घेतला पाहिजे आणि ह्या पूढे त्यांनी अफवा पसरवू नये.

#### न्याय 2


**बरेचदा, आपण इतरांच्या चूकांकडे पाहतो. त्यामूळे आपल्याला चांगले वाटते कादाचीत आपण त्यांच्या पेक्षा बरे आहोत असे. परंतू आपण सर्वांनीच पाप केले आहे. सुदैवाने देवाने आपल्या पापांपासून तारण देऊ केले आहे. देव तारण न पावलेल्या लोकांकडे प्रेमाने पाहतो आणि आशा करतो की ते पश्चाताप करतील. देव लोकांकडे ज्या दृष्टीने पाहतो व त्यांना जशी वागणूक देतो तसे आपण केले पाहिजे.**

#### जीवन चरित्र (वकील) 2

वकीलाचे काम आहे की लोकांचा बचाव करावा. जर हे तुमचे काम आहे तर हे माहिती करणे चांगले आहे की लोकांचे संरक्षण करण्यासाठी देवाला वकीलांची गरज आहे. बरेचदा असे लोकं असतात जे गरीब व गरजू लोकांना योग्य वागणूक देत नाही कारण ते स्वतःचे संरक्षण करू शकत नाही. *स्तोत्र 82:3 गरीब व अनाथ यांचा न्याय करा, दीन व कंगाल यांची दाद घ्या.*

*जवाबदा-या:* वकीलाची जवाबदारी आहे की त्याला कायदे माहीत असावे, नक्कीच, परंतू त्याला हे सुध्दा माहित असावे की समाजात कचेरीत कोणत्या प्रकारच्या घटना घडत आहेत. एखादी व्यक्ति गरीबाचा छळ करत आहे आणि गरीब व्यक्ति इतर कोणाचा तरी फायदा घेवू पाहत आहे ह्यातील फरक समजणे कठिण असू शकते.

*संधी:* वकीलांना प्रशिक्षित करण्याची आवश्यकता त्यांना समाजामध्ये चांगल्या जागी ठेवते केवळ यासाठी नव्हे की त्यांनी त्यांच्या ग्राहकांचा बचाव करावा परंतू सामाजाचाही बचाव करावा. सर्व प्रकारच्या लोकांबरोबर व्यवहार करण्यात ते तरबेज होतात, जेणे करून ते एखाद्या मुद्यासाठी उभे राहतील आणि देवाचे मत प्रभावीपणे सांगू शकतील. ते समाजाची आतील कार्यप्रणाली सुध्दा पाहतात आणि हे ठरवितात की कोणत्या गोष्टी अधिक हित करू शकतात.




## प्रश्न व उत्तरं 2

1. जर येशू माझा वकील आहे, तर मला जे पाहिजे ते करून मी देवाबरोबर नेहमी योग्य राहू शकतो काय? (जेव्हा आपण क्षमा मागतो तेव्हा देव आपल्या सर्वात वाईट पापांची सुध्दा क्षमा करतो. परंतू येशूने स्पष्ट सांगितले की आपण आपल्या इच्छे प्रमाणे काहीही करून देवासमोर योग्य राहू शकत नाही. स्वर्गात जाण्याची अट आहे, ती चांगले कार्य करणे नसून येशूवर विश्वास ठेवणे ही आहे, जेव्हा व्यक्ति येशूवर विश्वास ठेवते तेव्हा पवित्र आत्मा मन बदलविण्यासाठी आणि त्या व्यक्तिमध्ये चांगले फळं आणण्यासाठी कार्य करतो. पौल आपल्याला सांगतो की आपण भित व कापत आपले तारण साध्य करतो. तुम्ही स्वत:चे तारण करू शकत नाही, परंतू आपण आपले तारण करण्यासाठी देवावर भरवसा ठेवू शकतो.)
2. असे वाईट लोक का असतात?
   अनेक लोकं देवावर विश्वास ठेवत नाहीत आणि त्याच्या ह्या वचनावरही विश्वास ठेवत नाहीत की आपल्याला आपल्या कृत्यांचे बक्षीस सार्वकालिकतेत मिळणार आहे. काही लोकांचे मन कठिण आणि कडू आहे आणि ते देवाला व त्याच्या लोकांना नाकारतात. बरेचदा, लोक इतरांना दुखावतात कारण ते स्वत: आत दुखावलेले असतात. उदा, एखादी व्यक्ति जिला कंम्प्यूटर हॅक करायला आणि नुकसान करायला आवडते ती व्यक्ति इतरांच्या विरूध्द वापरलेल्या अधिकारामूळे जे असुरक्षितता आहे त्याची भरपाई करत असेल. आपल्यासाठी देवाची प्रिती महान आणि अद्भूत आणि शुध्द आहे आणि जग ती समजू किंवा स्वीकारू शकत नाही.
3. अफवा सत्य आहे की नाही हे मी कसे समजू शकतो? अफवे संबंधी मी काय करावे? आपण कधीच अफवा पसरवू नये, मग ती सत्य असो वा नसो. केवळ त्या लोकांना इतर लोकांबद्दल वाईट गोष्टी समजल्या पाहिजे जे अधिकाराच्या जागेवर आहेत व जे इतरांचे संरक्षण करू शकतात. तरूण ह्या नात्याने तुम्ही विश्वासयोग्य प्रौढाचा सल्ला घेवू शकता, आई किंवा वडील, शिक्षक, किंवा पाळक जे तुम्हाला सद्सदविवेक शिकण्यासाठी मदत करतील.
4. योसेफाने कोणत्या गोष्टींची जोखीम घेतली? शेवटी त्याचा काय फायदा झाला?
   स्थानिक आणि तातपूरती प्रतिष्ठा, काम, घर, भविष्यातील नेतृत्व......देवाच्या मुलाची वाढ करणे, पवित्र शास्त्रातील नाव, नितिमान पुरूष म्हणून सार्वकालिकतेसाठी नाव लौकीक....
5. योसेफाच्या स्वप्नात काय घडले?
   त्याने स्वप्नात देवदूत पाहिला ज्याने त्याला सांगितले की मरीयेचा पत्नी म्हणून स्वीकार कर.

## कोड्यांची उत्तरे 2






## खेळ

*रिले शर्यत*

**मुलांना संघात विभागा. खोलीच्या दुरच्या बाजूला पुसता येणारा फळा किंवा मोठा कागद लावा. जेव्हा तुम्ही जा म्हणाल तेव्हा प्रत्येक संघाचा एक खेळाडू धावून पाठांतर वचनाचा एक शब्द त्याच्यावर लिहिल. तो व्यक्ति पेन घेऊन  परत धावत येतो आणि संघाच्या दुस-या व्यक्तिच्या हातात देतो, ती व्यक्ति कागदाकडे धावत जाते आणि वचनाचा पुढचा शब्द लिहिते या प्रकारे. ज्या संघाचे पहिले संपेल तो संघ जिंकेल.**






## गृहपाठ

**जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्ति बद्दल अफवा ऐकता तेव्हा उघडपणे म्हणा की ती केवळ अफवा आहे आणि आपण अफवेवर संशय घ्यावा आणि त्या व्यक्ति बद्दल जे उत्तम त्याचा विचार करावा.**

# राजेशाही की दीन जन्म

03



## येशूचा जन्म: लूक 2:4-20

### नाटक (भाग एक)

पुढारी, तपासक व प्रतिनिधी ह्यांच्या बरोबर आजच्या योजनेची चर्चा करतो.  तपासकाला वाटते की ती जास्त अनुभवी आहे म्हणून तिने गोठयात जाऊन येशू बाळाला पहावे. पुढारी म्हणतो कि, तिच्यासाठी व प्रतिनिधीसाठी हे योग्य ठरेल की त्यांनी मेंढपाळांबरोबर थांबावे आणि त्यावेळेस पुढारी सरळ गव्हाणी मध्ये जाईल. ते वेळ यंत्रामध्ये चढून त्यांच्या कार्यवर जात असतांना तपासकाची वृत्ती वाईट असते.

### धडा 3

मेंढरं खूप हुशार नसतात, ते खाण्यासाठी चांगले असतात, म्हणून त्यांची काळजी घेतली पाहिजे. मेंढराची काळजी घेणे कठिण काम नाही. त्याच्यासाठी तुम्हाला कॉलेजची डिग्री किंवा विशेष प्रशिक्षणाची गरज नाही आणि तुम्हाला जास्त पगारही मिळणार नाही. परंतू तुम्ही शूर आणि खूप विश्वासयोग्य असले पाहिजे. परंतू मोठी गोष्ट ही आहे की मेंढरं कधीही मेंढरं असण्यापासून विश्रांती घेत नाहीत,  मेंढपाळ कधीच मेंढपाळपणा पासून विश्रांती घेत नाहीत. हे खूप कंटळवानं काम असू शकतं.

लूक 2:8-20 वाचा

देवाने निर्णय घेतला की ज्या लोकांना तो येशू बद्दल सांगेल ते सर्वसाधारण लोक राहतील. मला वाटतं मी धार्मिक पुढारी किंवा खूप प्रसिध्द लोकांची निवड केली असती, परंतू देवाने त्या ऐवजी मेंढपाळांची निवड केली.

येशूच्या संपूर्ण जीवनात त्यांने श्रीमंत नाही, प्रसिध्द नाही, तर सर्वसाधारण लोकांबरोबर वेळ घालविण्याची निवड केली.

येशूने असे का केले?  येशू केवळ श्रीमंत आणि अधिकारयुक्त आणि प्रसिध्द लोकांचे तारण करावयास आला नाही. तो सर्वांचे तारण करावयास आला, आणि हे करण्यासाठी तो असा व्यक्ति बनला ज्याला आपण मित्र म्हणून पाहू शकतो. तो भारी चांगले कपडे मागू शकला असता परंतू त्याऐवजी त्याच्याकडे आवश्यकते पेक्षा अधिक कपडे कधीच नव्हते. त्याच्या कडे भरपूर नोकर चाकर असू शकत होते परंतू तो इतरांची सेवा करण्यासाठी तयार होता.  त्याच्या कडे सुंदर महल असू शकला असता परंतू पवित्र शास्त्र सांगते की त्याला डोके ठेवण्यासाठी सुध्दा जागा नव्हती. तो चांगले जेवण खाऊ शकला असता परंतू त्याऐवजी त्याने इतर कोणाच्या तरी कार्यक्रमासाठी द्राक्षरस तयार करण्याची व इतरांना खाऊ घालण्याची निवड केली. ह्या प्रकारे आपण समजू शकतो की येशू सोबत जुळण्यासाठी आपल्याला श्रीमंती किंवा अधिकाराची गरज नाही.

### पाठांतर वचन 3

करिंथकरांस दुसरे पत्र 8:9 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहीत आहे; तो धनवान असता तुमच्याकरता दरिद्री झाला, अशा हेतूने की, त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे.

### नाटक (भाग दोन)

त्यांच्या कामगिरी वरून परत येत, तपासक, आणि प्रतिनिधी खूप उत्साही आहेत आणि त्यांनी मेंढपाळांबरोबर असतांना आकाशात पाहिलेल्या देवदूतांच्या सैन्यातील देवदूताची ते परत मोजणी करत होते आणि त्या प्रसंगाचे फोटो सुध्दा दाखवित होते. पुढारी तपासकाला विचारतो की तिच्या कामगिरी बद्दल तिला काय वाटले. ती सांगते की जरी तिने मेंढपाळांबरोबर शेतात थांबण्यात बराच वेळ घालविला तरी, शेवटी तिला गीत गाणारे देवदूत दिसले एवढेच नाही तर, ती मेंढपाळाच्या सोबत येशू बाळाला पाहण्यासाठी सुध्दा गेली.

### न्याय 3

ज्या रितीने येशू सन्मानास पात्र असूनही त्याने त्याची मागणी केली नाही तसेच आपण सुध्दा देवाने आपल्याला राजा व राणी असे निर्माण केले तरी त्यांच्या प्रमाणे वागणूक मिळावी अशी मागणी न करता नम्र राहू शकतो.


### जीवन चरित्र (मेंढपाळ)  3

नविन कामक-यांसाठी सर्वात चांगले काम मेंढपाळाचे आहे. मोशे व दावीद राजा दोघेही मेंढपाळ होते आणि देवाने मेंढपाळांना येशूच्या जन्माची घोषणा करण्यासाठी देवदूतांना पाठविले.

*जवाबदा-या:* ज्या व्यक्ति साठी मेंढपाळ काम करत आहे त्याच्या इच्छा मेंढपाळाला माहित असाव्या, जसे त्यांना चांगल्या कुरणात नेणे व घरी परत आणणे. मेंढपाळाने मेंढरांना इतर प्राण्यांपासून, घातक वनस्पती पासून, खराब वातावरणा पासून, आणि धोक्याच्या प्रदेशापासून सुरक्षित ठेवले पाहिजे. मेंढपाळाने त्याच्या मेंढरांकडे लक्ष द्यावे जर कोणी हरवले, किंवा झुडपात अडकले किंवा चोराने चोरले तर.

*संधी:* मेंढपाळ ह्या नात्याने तुम्ही प्राण्या बद्दल आणि त्यांची अधिक चांगली काळजी कशी घ्यावी ह्या बद्दल शिकता. चांगले जेवण त्यांना चांगले वाढण्यासाठी मदत करते, धोक्या पासून सुरक्षा तुमचे काम सोपे करते. आणि जेव्हा तुम्ही वाट पाहता, तेव्हा तुम्ही तुमच्या रविवार शाळा वर्गातील साहित्य आणू शकता आणि वचन पाठ करू शकता, धडयांचा विचार करा आणि तुमच्या जीवनात त्याचे कसे लागूकरण करावे ह्याचा विचार करा.

## प्रश्न व उत्तरं 3




1. सर्वांसोबत पटवून घेणे महत्वाचे आहे, बरोबर? (मुलांना शेजा-यावर प्रिती करण्याचा ताण, परंतू देवाला प्रथम स्थान देणे, ह्या बद्दल चर्चा करू द्या. पवित्र शास्त्र सांगते की आपण शक्य तितकं शांतीने राहिले पाहिजे. (रोम 12:18) परंतू आपण इतरांच्या निर्णया पेक्षा स्वतंत्रपणे देवाचे अनुसरण केले पाहिजे (योहान 21:22) विशिष्ट प्रसंगांची चर्चा करा, जर त्यांना शांती किंवा देवाचे अनुसरण करणे ह्यांचे उदाहरण दिसत असेल तर किंवा ह्या दोन्ही गोष्टी करण्याचा मार्ग असेल तर.)
2. नम्र असणे म्हणजे काय? ( नम्रता एक सद्गुण आहे, जो माणसाला त्याची क्षमता, त्याचे गुण ओळखून, त्याचा उपयोग इतरांच्या भल्यासाठी न बोलता करणे शिकविते. ज्या स्तरा पर्यंत व्यक्ति नम्र होते, तो पर्यंत व्यक्ति इतरांच्या मनात महानता बळकट करते.)
3. सर्व चांगले व्यक्ति स्वर्गात जातात, नाही काय? (नाही, स्वर्गात प्रवेश करण्यासाठी चांगले व्हावे असे देवाने आपल्याला कधीच सांगितले नाही, परंतू त्यांने आपल्याला आपले अंतकरण त्याला देण्यास सांगितले आहे.)
4. देवाची इच्छा नाही का की आपण श्रीमंत व्हावे? (मुलांना ह्याची चर्चा करू द्या आणि मग सांगा की पैसा असणे वाईट नाही. जेव्हा तुम्ही देवाच्या अधी पैश्याला प्रधान्य देता तेव्हा ते वाईट आहे किंवा जेव्हा तुम्ही काहीतरी प्राप्त करण्यासाठी देवाला अनुसरण्याचा विचार करता तेव्हा ते वाईट आहे. देव ह्या गोष्टीला प्राधान्य देतो की आपण पृथ्वी पेक्षा स्वर्गात आपले धन साठवावे.) (कलस्सै 3:2)
5. जर तुम्ही येशू बाळाची भेट घेतली असती तर तुम्ही त्याला काय दिले असते? (मुलांना त्यांची बक्षीस सांगू द्या)

## कोड्यांची उत्तरे 3





## खेळ 3

*ओळी ओळीने*



वचन पाठ करण्यासाठी ह्या खेळाचा उपयोग करा. वचनाची ओळख करून घेण्यासाठी दोनदा वचनाची पुनरावृत्ती करा. मुलांना 1,2,1,2 इ. म्हणत दोन गटात विभागा, सर्व 1 अंकांना एका बाजूला व 2 ला खोलीच्या दुस-या बाजूला जाऊ द्या. संघ मग आळीपाळीने पाठांतर वचन म्हणेल एकएक शब्द किंवा वचनाचा एक भाग म्हणत. वचन पाठ केल्यावर मुलांना पुन्हा 1 आणि 2 म्हणत गटात विभागा. पुन्हा नविन गट आळीपाठीने वचन म्हणेल. दोन फे-यांनंतर प्रत्येक गटातील एक असे दोन स्वयंसेवक एकत्र वचन बोलतील जसे गटांनी केले तसे. मग ते न पाहता वचन बोलण्याचा प्रयत्न करतील. जो पर्यंत प्रत्येकाचं वचन पाठ होत नाही तोवर खेळा व सराव करा.




### गृहपाठ 3

**एक आभाराचे पत्र तयार करा व कोणातरी ते जे करतात त्या बद्दल त्यांचा सन्मान करण्यासाठी द्या. अशा व्यक्तिचा विचार करा जी येशू सारखे सन्मानास पात्र असली तरी ती त्याची मागणी करत नाही. उदा. पहिले प्रतिक्रिया देणारे, रस्ते स्वच्छ करणारे, कचरा गोळा करणारे, नर्स किंवा परिचारीका.**

# कठिण काळ 04



## येशूचे कुटुंब मिसर देशात जाते: मत्तय 2:13-23

### नाटक (भाग एक)

तपासक गटातील सहभाग्यांना मागील आठवडयाच्या शेवटी परदेशातुन आलेल्या कुटुंबासोबतच्या भेटी बद्दल सांगते की कशा प्रकारे संस्कृतीने तिचा गोंधळ घातला आणि त्यांच्या काही टिप्पण्यांनी तिच्या भावना दुखाविल्या. पुढारी आणि प्रतिनिधी तिला प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करतात की नविन मित्र बनविणे चांगले आहे आणि तिने त्या कुटुंबाचे त्या भागात स्वागत आहे असे त्यांना वाटण्यास मदत करावी. तपासक पुन्हा त्यांची भेट घेवू इच्छित नाही. चर्चे नंतर ते त्या दिवसाची त्यांची कामगिरी सुरू करतात, काळात मागे जाणे आणि लहान येशूला त्याच्या कुटुंबाबरोबर मिसर देशात काही काळासाठी जातांना पाहणे.

### धडा 4

दुस-या शहरात किंवा देशात जाणे कठिण आणि खर्चीक असते, म्हणून स्थलांतर करण्यासाठी तुमच्याकडे चांगले कारण असावे. तुम्हाला नवीन काम शोधावे लागते आणि चांगले दुकाने आणि पाणी कुठे मिळेल हे सर्व शोधावे लागते. लोक वेगळे कपडे घालतात आणि वेगळे बोलतात सुध्दा. ते आरामदायक नसतं.

**मत्तय 2:13-23 वाचा**

ह्या दोन्ही प्रवासाचे भविष्य जुन्या संदेष्टयांनी केले होते आणि दोघांनीही हे दाखविण्याची मदत केली की येशू मसिहा होता.
परंतू इस्त्राएलाला परत जाणे कठिण निर्णय होता! मरीया आणि योसेफ आणि त्यांच्या नविन कुटुंबाला तिथे नाकारण्यात व धमकाविण्यात आले होते आणि आता मिसर देशात चांगले जीवन होते. मी घाबरलो असतो आणि तिथं इतरांवर विश्वास ठेवणे कठिण असते. परंतू देवाच्या दूताने त्यांना सांगितले की तिथे ते सुरक्षित आहेत, म्हणून त्यांनी आज्ञापालन केले. मरीया आणि योसेफ ह्यांनी यहूदी समाजामध्ये साजेल असे सुंदर नवीन घर नासरेथ मध्ये तयार केले, नविन मित्र बनविले आणि काम सुध्दा शोधले.
आपण सुध्दा देव जिथे सांगतो तिथे जाऊ शकतो. तो आपल्यासाठी नविन मित्र व परिस्थितीसह जागा तयार करतो आणि आपण नेहमी खात्री धरू शकतो की तो आपल्यासाठी जे उत्तम ते करत आहे आणि तो आपल्या बरोबर राहील.
आपण नेहमी आपल्या क्षेत्रातील नविन लोकांबरोबर चांगले राहण्याचा प्रयत्न करावा. त्यांचे मित्र व्हा, त्यांना आजूबाजूच्या जागा दाखवा आणि लक्षात घ्या की जरी ते वेगळया मार्गाने व संस्कृतीतून आले तरी ते ठिक आहे.

### पाठांतर वचन 4

इफिसकरांस पत्र 4:32 आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा.

### नाटक (भाग दोन)

त्यांच्या कामगिरी वरून परत येत, ते चर्चा करतात की जेव्हा ते येशूच्या कुटुंबाच्या मागे मिसर मधील मोठया शहरात गेले तेव्हा किती कठिण होते आणि ते त्यांच्या राहत्या शहरापेक्षा किती वेगळे होते. ते किती कठिण असावे! आणि जेव्हा ते काळात थोडे वेगाने पुढे गेले तेव्हा त्यांनी येशूच्या कुटुंबाला त्यांच्या जुन्या शहरात येतांना पाहिले, ते मिसर देशात जात असतांना त्यांनी अनुभवलेला नाकार आणि धोका ह्याची आठवण करीत. तपासकाच्या लक्षात येते की येशूच्या कुटुंबाने मिसर देशात जो अनुभव घेतला कदाचीत तसेच परदेशीय कुटुंबाला वाटत असेल. कदाचित त्यांच्या दुखाविणा-या टिप्पण्या त्यांच्या संस्कृतीत निर्दयी नसतील, आणि ती येशू प्रमाणे कोणत्याच धोक्यात नसेल. ती निर्णय घेते की ती त्या परदेशीय कुटुंबाची मैत्रीण बनेल आणि त्यांचा दृष्टीकोन समजुन घेण्याचा प्रयत्न करेल.

### न्याय 4

कधी कधी आपण मित्र किंवा गटांकडून नाकारले जातो. जेव्हा हे घडतं तेव्हा क्षमा करणं खूप कठिण असतं. परंतू कधी कधी आपल्याला नाते संबंध दुरूस्त करण्याची किंवा त्या गटात पुन्हा सहभागी होण्याची संधी मिळते. देवाच्या मदतीने आपण मनात अडी न बाळगता ते करू शकतो.


### जीवनचरित्र (टॅक्सी चालक) 4

टॅक्सी चालक समाजाला महत्वाची सेवा देतो. टॅक्सी चालक सेवेचे कौशल्य विकसित करू शकतो येशू सांगतो सेवा त्याच्या राज्याचा पाया आहे.

*जवाबदा-या:* टॅक्सी चालक ज्याचा भाग आहेत किंवा ज्यांच्यासाठी काम करतात अशी संस्था नेहमी असते. ते किंमत, कुठुन सुरवात करायची, वेळ इ. ठरवत असतात.


*संधी:* टॅक्सी चालक नेहमी लोकांशी संवाद साधतात. काही गरीब असतात तर काही श्रीमंत. काहीच्या आर्थिक गरजा असतात तर काहींच्या भावनीक गरजा असतात. चालक ह्या नात्याने तुम्ही तुमचे ऐकण्याच्या कौशल्याला धार लावू शकता हे समजण्यासाठी की प्रत्येक व्यक्तिला नेमकी कशाची गरज आहे आणि तुमची ज्या क्षेत्रात जवाबदारी आहे त्यात तुम्ही कशी मदत करू शकता.

## प्रश्न उत्तरं 4




1. मी कोणाचे ऐकावे? (प्रथम देवाचे आणि मग ह्या जगातील तुमच्या अधिका-यांचे)
2. अशी गोष्ट सांगा ज्यात तुम्ही चांगली भूमिका निभाविली ज्याचा परिणाम तुमच्या देवाबरोबरच्या व इतरांबरोबरच्या संबंधांवर झाला. (आपण दररोज घेत असलेल्या लहान निर्णयाबरोबर वागणे. अनेकदा आपल्या गर्वावर विजय मिळवत, ह्या मूळे आपल्याला भविष्यामध्ये अधिकाधिक चांगले निर्णय घेण्यासाठी संयम ठेवण्यास मदत मिळते.)
3. तुम्ही कधी एखाद्या अशा व्यक्तिची क्षमा केली का जिने तुम्हाला काही तरी केले? तुम्हाला कसे वाटले? (मुलांना सांगू द्या की त्यांना कसे वाटले आणि त्यांना आठवण करून द्या की देवाने त्यांना क्षमा करण्यासाठी बोलाविले आहे.)
4. तुम्हाला काय वाटतं मिसर देश सोडून इस्त्राएल देशात जातांना मरीया आणि योसेफासाठी सर्वात कठीण काय होते? (प्रत्येक मुलाला त्याचा दृष्टीकोन सांगू द्या.)
5. योसेफाचा आवडता पाळीव प्राणी कोणता असेल असे तुम्हाला वाटते? (त्यांना सांगू द्या, शिक्षक ह्या नात्याने तुम्ही सुध्दा सांगू शकता. त्या प्रदेशात कोणत्या प्रकारचे प्राणी होते ह्याची त्यांना आठवण करून द्या.)

## कोड्यांची उत्तरे 4










## खेळ 4

*पानांची शर्यत*

प्रत्येक मुलाला एखाद्या झाडाचे हलके पान व पुंगळी द्या. मुलांना गटात विभागा. प्रत्येक संघासाठी एक जागा ठरवा जिथे त्यांनी सर्व पानं नेण्याचा प्रयत्न करावा. जेव्हा तुम्ही सुरू करण्याचा इशारा कराल तेव्हा त्यांनी सर्व पानं पुंगळीतुन फुकुन - फुकुन त्यांच्या निर्धारित जागवेर नेण्याचा प्रयत्न करावा. जो संघ जास्त पानं घेवून जाईल तो जिंकेल. (कदाचीत सर्व पानं त्यांचे नसतील, जर ते दुस-या संघाचे पान त्यांच्या जागी घेवून गेले तर.)






## गृहपाठ 4

जी व्यक्ति नुकतीच स्थलांतरीत झाली तिच्या बद्दल माहीती करा आणि त्यांना तोवर प्रश्न विचारा जो पर्यंत तुमच्यात व त्यांच्या काय समानता आहे हे तुम्हाला समजत नाही. तुम्हाला दोघांनाहि काय आवडतं? त्यांना तुमच्या मंडळीत आमंत्रित करा.

# असाधारण येशू

05

**मंदिरात येशू: लूक 2:41-51**



## नाटक (भाग एक)

**प्रतिनिधी त्याच्या संवाद यंत्राबरोबर खेळतो, आणि मजेसाठी त्याचे सर्व सेटिंग बदलतो. संघ आजच्या कामगिरीसाठी एकत्र होत असतांना, पुढारी सर्वांना त्यांची सेटिंग समायोजित करायला सांगतात. प्रतिनिधी लक्ष देत नाही तरी सुध्दा असे दाखवितो जणू सर्व काही नियंत्रणात आणि तयार आहे. जेव्हा पुढारी त्याला प्रश्न करतात तेव्हा तो बचावात्मक होतो आणि पुढा-याचे अधिक कमी ऐकतो आणि त्याला मध्ये बोलतो. यंत्र जसे सुरू होऊ लागते तसे ते त्यात चढतात ह्यासाठी की काळात मागे जावे आणि त्यांना 12 वर्षाच्या येशूला मंदिरात पाहता यावे.**

## धडा 5

**येशू सारखा मुलगा असणे मनोरंजक असेल!**
**लूक 2:41-51 वाचा**
**जेव्हा मरीया आणि योसेफाने 12 वर्षाच्या येशूला मंदिरात धार्मिक पुढा-यांबरोबर बसून देवाच्या गोष्टींची चर्चा करतांना पाहिले तेव्हा त्यांना किती धक्का बसला असेल ह्याची कल्पना करा. त्याचे प्रश्नांचे उत्तरं इतके ज्ञानाने भरलेले व अंतरदृष्टीपूर्ण होते की वडीलजण बसून त्याचे ऐकत होते आणि येशू सुध्दा इतरांचे ऐकत होता, ते काय बोलतात हे तो ऐकू इच्छित होता.**
**येशू कोण होता ह्याच्या बद्द्ल हे बरच काही सांगतं. तो इतका जवाबदार होता की 12 वर्षाचा असतांना त्याचे आईवडील त्याच्यावर भरवसा ठेवत होते. येशूने लहान असतांना देखील विश्वासूपणा आणि जवाबदारी दाखविली होती. येशू शिकलेल्या प्रौढाबरोबर बसून बोलण्या इतका आत्मविश्वासू व धैर्यवान होता परंतू तो बसून ऐकण्याएवढा शाहणा सुध्दा होता.**
**येशू त्याच्या सर्व मुलांच्या द्वारेही कार्य करतो, तुमच्या आणि माझ्या द्वारे सुध्दा! खरं तर लहान मुलांचा जीवनाचा दृष्टीकोन प्रौढांपेक्षा वेगळा असतो आणि देव ह्या गोष्टीचा उपयोग करू इच्छितो. प्रेषित पौलाने तिमथ्याला त्याच्या पत्रात म्हटले? 'कोणी तुझ्या तारूण्याला तुच्छ मानू नये तर भाषण, वर्तन, प्रिती, विश्वास व शुध्दता यांविषयी विश्वास ठेवणा-या लोकांचा कित्ता हो.'**
**जेव्हा तुम्ही पवित्र शास्त्र वाचता, प्रार्थना करता आणि देव जे तुम्हाला सांगत आहे ते ऐकता तेव्हा तो तुम्हाला पवित्र शास्त्रातील अशा गोष्टी दाखविल ज्या तुम्ही कधी पाहिल्या नाहीत. त्यातील काही गोष्टी केवळ तुमच्यासाठी असतील आणि काही इतरांना सांगण्यासाठी असतील.**
**जेव्हा आपण लोकांबरोबर बोलतो, तेव्हा त्यांच्या बरोबर बोलणे व त्यांचे ऐकणे चांगले असते. खरं तर, जरी बोलण्यापेक्षा ऐकणे कठिण असले तरी ऐकणे महत्वाचे आहे. आणि जेव्हा आपण ज्या गोष्टी महत्वाच्या व ज्याची आपल्याला खात्री आहे अशा गोष्टी बोलतो तेव्हा इतर लोक आपले ऐकतील.**

## पाठांतर वचन 5

**याकोबाचे पत्र 1:19 माझ्या प्रिय बंधूंनो, तुम्हांला हे कळते. तर प्रत्येक माणूस ऐकण्यास तत्पर, बोलण्यास धीमा, रागास मंद असावा.**

## नाटक (भाग दोन)

**त्यांच्या कामगिरी वरून परत येऊन पुढारी प्रतिनिधीला त्याच्या बरोबर बोलण्यासाठी बाजूला घेतो. त्याच्या यंत्रावरील चूकीच्या सेटिंगमूळे एकत्र राहण्यासाठी, त्याच्याशी संपके करणे अशक्य झाले, त्याच्या यंत्रावरील आवाजाच्या सेटिंग मूळे मंदिरात मोठा आवाज झाला आणि प्रवास करणा-या प्रतिनिधींना मोठा त्रास झाला. जवळ जवळ त्यांची कामगिरी अपयशी ठरली. प्रतिनिधी मान्य करतो की तो चूक होता आणि म्हणतो की तो पुढच्या वेळेस ऐकेल.**

## न्याय 5

**येशूने शिकविले परंतू त्याने ऐकले सुध्दा. इतरांचे ऐकणे महत्वाचे आहे! आपण ऐकून काही तरी शिकू शकतो आणि त्यामूळे व्यक्तिला बरे वाटते.**

## जीवनचरित्र (शिक्षक) 5

**शिक्षकांचे स्थान महत्वाचे आहे. देव त्यांचा उपयोग लोकांना प्रशिक्षित आणि त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी करून घेतो. कधी कधी आपल्याला वाटतं की जे शिक्षक ख्रिस्ती नाहीत ते चांगले नाहीत, परंतू देव सर्व लोकांवर प्रिती करतो आणि तो ज्या लोकांवर प्रिती करतो त्यांची खरी काळजी घेणा-या कोणा बरोबरही काम करेल. निकदेमाने ओळखले की येशू देवाकडून आलेला शिक्षक होता.**

*जवाबदा-या:* अर्थातच शिक्षक त्यांच्या नियोक्त्यांच्या किंवा व्यवस्थापकांच्या अधिकाराखाली असतात आणि त्यांनी त्यांचे मार्गदर्शक तत्व पाळले पाहिजे. परंतु त्यांनी त्यांची जवाबदारी असलेल्या त्यांच्या विषयाचे ज्ञान आणि शिकविण्याचे कौशल्य वाढविले पाहिजे. ह्यात लोकांच्या बद्द्ल अधिक जाणून घेणे व ते कसा संवाद साधतात हे जाणून घेणे महत्वाचे आहे. समाज कसा बदलत आहे ह्याबद्द्ल ते जागृक असले पाहिजे आणि त्यांची शिकविण्याची शैली त्यांनी त्याप्रमाणे जुळवून घ्यावी जेणे करून ते त्यांच्या विद्यार्थ्यांबरोबर अधिक चांगल्या रितीने संबंध जोडू शकतील.


*संधी:* शिक्षकांनी त्यांचे कौशल्या नेहमी विकसित केले पाहिजे आणि त्याद्वारे वैयक्तिक फायदा सुध्दा करून घेतला पाहिजे. त्यांना जीवनांना आकार देण्याची संधी असते- जे काही शिक्षक शिकवितात त्याच्या वर आधारित निर्णय घेण्यासाठी आणि भविष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी ज्ञानाची बांधणी करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांवर अवलंबून असतात. विद्यार्थ्यांमध्ये जे कौशल्य आहे त्याचे निरिक्षण करून शिक्षक त्याला त्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी निर्देशित करू शकतात. एक चांगला शिक्षक लोकांवर आणि त्यांच्या पुढील पिढीवर प्रभाव टाकतो.


## प्रश्न उत्तरं 5

1. इतरांना प्रोत्साहन देणे ह्यातून प्रिती कशी दिसून येते? (त्यांचे मत सिध्द करण्यासाठी मुलांना वास्तविक उदाहरणं विचारा.)
2. तुम्हाला असा प्रसंग आठवतो का की जेव्हा तुम्ही तुम्हाला जे पाहिजे त्या ऐवजी इतर कोणाला जे पाहिजे ते करू दिले? (मानव ह्या नात्याने इतर कोणाला जिंकू देणे आपल्यासाठी कठिण आहे. तुमच्या विद्यार्थ्यांना जुन्या गोष्टी सुध्दा सांगू द्या ज्यात त्यांनी दुस-या कोणाला तरी त्याच्या इच्छे प्रमाणे करू दिले. दुर्दैवाने काही लोकांनी कधी दुस-यांना जिंकू दिले नाही. जेव्हा आपण इतर कोणाला जिंकू देत नाही तेव्हा ते किती वाईट असतं आणि सर्वांनी शांतीने रहावे अशी देवाची इच्छा आहे ह्याची चर्चा करा.)
3. तुम्ही शाळेतील तुमच्या वर्गात तिरस्कार, नाकार किंवा अवमूल्यन ह्याचे कोणते उदाहरण पाहिले? (त्यांनी काय पाहिले, आणि ते कसे चांगले नाही आणि ज्या व्यक्ति बरोबर हे घडतं त्याला कसं दु:ख होतं ह्या बद्द्लच्या त्यांच्या चर्चेला चालना द्या.)
4. अशी कोणती गोष्ट आहे जे इतर कोणीही करू शकत नाही आणि तुम्ही करू शकता? (ज्या गोष्टी इतर मुलं करू शकत नाहीत त्याबद्दल मुलांना विचारा उदा. सार्वजनिकपणे बोलणे, उंच उडी मारणे, गाणे गाणे इ. त्यांना आठवण करून द्या की देवाने प्रत्येकाला विशेष दानं दिली आहेत.)
5. जर तुम्ही येशूला लहानपणी देवाच्या गोष्टींची चर्चा करतांना पाहिले असते तर तुम्ही काय विचार केला असता? (मुलांचे उत्तरं ऐका.)

## कोड्यांची उत्तरे 5










## खेळ 5

*कपं*

मुलांना 2 किंवा अधिक संघात विभागा. प्रत्येक संघाला एका ओळीत 6 कप दया: 5 पाण्याने भरलेले आणि शेवटी 1 रिकामा. प्रत्येक संघाकडे थर्माकोलचा, हलक्या प्लास्टिकाचा किंवा इतर कुठला तरी हलका चेंडू राहिल. हा चेंडू पाण्याने भरलेल्या पहिल्या कप मध्ये ठेवा. मुलांनी फुंकून, फुंकून हा चेंडू पाण्याच्या एका कप मधून दुस-या कप मध्ये न्यावा जो वर तो रिकाम्या कप मध्ये जात नाही. मग दुस-या खेळाडूची संधी राहील. जो संघ त्यांचे सर्व चेंडू कप मध्ये टाकेल तो जिंकेल.






## गृहपाठ 5

ऐकणे व जे काही तुम्ही ऐकले ते तुमच्या स्वत:च्या शब्दात सांगणे ह्याची पुनरावृत्ती करा. प्रथम पवित्र शास्त्र मोठयाने वाचा आणि हे लक्षात घ्या की देव त्याद्वारे तुमच्याशी बोलत आहे, त्याचा अर्थ काय हे तुमच्या शब्दात सांगा. दुसरी गोष्ट, कुटुंबातील सदस्याचे लक्षापूर्वक ऐका आणि तुम्ही जे ऐकले ते त्याला सांगा व त्याच्या कडून माहिती करून घ्या की त्याला तेच सांगायचे होते का.

# महान सुरवात

06



## येशूचा बाप्तिस्मा: मत्तय 3:13-17

### नाटक (भाग एक)

प्रतिनिधी वेळ यंत्राची यंत्रणा शिकत आहे आणि पटकन शिकत आहे. लवकरच, त्याच्या कडे यंत्र सुरू करण्यासाठी सोपी रीत आहे, तो दावा करतो की जर त्यांनी यंत्र सुरू करतांना सोपी रीत वापरली तर कमी इंधन वापरुन आणि काही सेटिंग वर ते वेळ वाचवू शकतात. आज मुख्य यांत्रीक सुट्टीवर आहे आणि पुढारी यंत्र चालवत आहे, परंतू प्रतिनिधी मध्ये मध्ये येतो आणि त्याच्या नविन युक्त्या वापरण्याचा प्रयत्न करतो. जरी पुढारी निराश आहेत तरी त्याच्या लक्षात येते की ते काम करत आहे आणि ते त्यांच्या कामगिरीवर जातात.

### धडा 6

येशू आता तरूण आहे आणि त्याची सार्वजनिक सेवा सुरू करण्यासाठी तयार आहे. त्याची इच्छा होती की त्याने ज्या योग्य त्या गोष्टी कराव्या म्हणून त्याने बाप्तिस्मा करणा-या योहानाची जो देवाचा संदेष्टा म्हणून ओळखला जात होता त्याची भेट घेतली. त्या वेळेस येशू कोण आहे हे समजणारा एकमेव व्यक्ति योहान होता, आणि येशू योहानाकडून बाप्तिस्मा घेऊ इच्छित होता. बाप्तिस्मा म्हणजे धुण्याचा सार्वजनिक विधी जो व्यक्तिसाठी नवीन सुरवातीचे प्रतिक आहे.

मत्तय 3: 11-17 वाचा

किती चांगला दिवस! येशू देवाचा पुत्र आहे अशी पुष्टी केली गेली आणि देव म्हणाला की तो येशू विषयी संतुष्ट आहे! हे ऐकणे किती चांगले असेल!
ही आश्चर्यकारक गोष्ट आहे. येशूला मनुष्यांच्या स्वीकृतीची गरज नव्हती, बाप्तिस्मा करणा-या योहाना सारख्या संदेष्टयाचीही नाही परंतू येशूने सर्व पाऊलं उचलण्याची निवड केली. आणि परिणाम इतका नाटयमय होता, देवाने स्वतः सार्वजनिक रित्या पुष्टी केली की येशू देव होता आणि तो देवाचे कार्य करित होता.
आपण देखील सर्व प्रकारचे पाऊलं उचलण्यासाठी तयार असले पाहिजे. येशूला तारणासाठी विनंती करणे, बाप्तिस्म्यासाठी शरण जाणे, प्रशिक्षण घेणे, तुमचे शिक्षक आणि पाळक ह्यांच्या हाता खाली काम करणे आणि इतरांकडून शिकणे. देव आपल्या जीवनात ह्या सर्व गोष्टींचा उपयोग इतरांना मदत करण्यासाठी करून घेईल.

### पाठांतर वचन 6

इब्री लोकांस पत्र 13:17 आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणांस हिशेब द्यायचा आहे हे समजून ते तुमच्या जिवांची राखण करतात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे; तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही.

### नाटक (भाग दोन)


त्यांच्या कामगिरीवरून परत आल्यावर संघातील सर्व सदस्यांचे केस अस्ताव्यस्त आहेत आणि त्यांच्या कपडयांवर धूळ आणि माती आहे. ते मागील काळात काही दिवस अडकून पडले होते, ते काळात मागे जात असतांना यंत्राचा जो भाग खराब झाला होता तो दुरूस्त करण्याचा प्रयत्न करत होते. यंत्रावर आड रस्त्याचा किंवा सोप्या रस्त्याचा उपयोग करण्यामूळे त्यांना बराच वेळ लागला आणि ते जणू परत आलेच नसते. थकलेले का होईना, ते परत आले व घरी जाऊन ते आराम करू शकतील म्हणून त्यांना आनंद वाटतो.

### न्याय 6

कधी कधी सोपा मार्ग घेण्याचा मोह होऊ शकतो. परंतू सर्व पाऊलं उचलणे आणि ह्या प्रक्रियेत इतरांनाही समाविष्ट करणे हे अधिक चांगले असते.

### जीवनचरित्र (ख्रिस्ती गीतकार) 6

मंडळीतील गीतकार संगीत शिकण्याचा आणि मंचावर चांगला दिसण्याचा प्रयत्न करतो, आणि तो मंडळीतील लोकांना उपासनेचा चांगला अनुभव पूरविण्यासाठी मदत करतो. पवित्र शास्त्रामध्ये वेगवेगळया वेळेस, आराधना समूहाने पूर्ण दिवस व पूर्ण रात्र आराधनेचे नेतृत्व केले. दुस-या वेळी आराधाना समूहाने लढाईचे नेतृत्व केले आणि केवळ आराधने ने शत्रूचा पराभव झाला. (2 इतिहास 20:14:25)



*जवाबदा-या:* मंडळीतील संगीतकार पाळकाचे किंवा अराधना पुढा-याचे निर्देश पाळतो. वेळेवर तयार राहणे फार महत्वाचे आहे, वाद्य टयून केलेले, स्वच्छ असावे आणि / किंवा तुमचा आवाज गाण्यासाठी मोकळा व सज्ज असावा.

*संधी:* वाद्यावर तुमचे कौशल्य विकसित केल्याने तुमच्या नोटस व कार्ड मधील बदलांची चिंता करण्यावर तुम्ही कमी वेळ घालविता आणि तुमच्या सहवादकांबद्दल आणि आराधना करणा-या लोकांबद्दल विचार करण्यात जास्त वेळ घालवता. तुम्ही केवळ हे पाहणार नाही की ते संगीताला चांगला प्रतिसाद देत आहेत की नाही, परंतू हे सुध्दा पाहू शकता की कोणाला विशेष प्रार्थनेची गरज आहे, कोणाचे मन भारी आहे, किंवा विचलित आहे, किंवा कोण देवाच्या आत्म्याने प्रभावित होत आहे. अशा परिस्थितीमध्ये तुमच्या प्रार्थना बदल घडवून आणतील.

.


## प्रश्न उत्तरं 6

1. जर देवाची आज्ञा न पाळल्याने मी प्रसिध्द किंवा फॅशनेबल होणार असेल तर? (अशा वेगवेगळया प्रसंगांबद्दल बोला. विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी मदत करा की अशी वेळ राहिल जेव्हा त्यांना देवाची आज्ञा पाळणे आणि प्रसिध्दी ह्या दोघांमधून एकाची निवड करावी लागेल.)
2. येशूख्रिस्ताच्या वाणीची आज्ञा न पाळयासाठी तुम्ही त्याला कोणते कारण सांगता? कदाचित हे की, तुमच्या कडे संदेश देण्याचे कौशल्य नाही, की तुम्ही एक स्त्री आहात, की तुमच्या कुटुंबामध्ये तुम्ही एकमात्र ख्रिस्ती व्यक्ति आहात असे? (पवित्र शास्त्रामध्ये तुम्हाला असे लोक मिळतील ज्यांनी देवाची आज्ञा न पाळण्यासाठी त्याला कारण सांगितले, परंतू लक्षात ठेवा, आपल्या कमतरता किंवा आपल्यात काहीच क्षमता नसल्या तरी येशू ख्रिस्त तुमच्या जीवनाचा उपयोग करण्यासाठी तुम्ही परिपूर्ण असावे अशी मागणी करत नाही. तो तुमच्या आज्ञा पालनाची मागणी करतो.)
3. आपण देवाला कसे खूश करू शकतो? (त्याला आपले हृदय देऊन, त्याची आज्ञा पाळून, त्याच्या बरोबर वेळ घालवून आणि लोकांवर प्रिती करून.)
4. तुम्ही कोणत्यातरी बाबतीत एखाद्या अधिका-याची आज्ञा पाळली ह्या बद्दल सांगा. (देव, आईवडील, शिक्षक इ.)
5. तुम्हाला वाटते का की आपले जीवन देवाला संतोषविणारे असावे ह्यासाठी येशू आपले उत्तम उदाहरण आहे आणि का? (मुलांचे मत ऐका आणि शेवटी हे सांगा कि ते ह्या कारणानमुळे की तो देवाचा पुत्र आहे जो सर्व गोष्टीत परिपूर्ण आणि पाप विरहित आहे.)

## कोड्यांची उत्तरे 6







## खेळ 6

*इथे आपल्या मध्ये*



ह्या खेळासाठी तुम्ही फुगे वापरू शकता, मध्यम आकाराचे किंवा कागदाचे चेंडू.

मुलांना खोलीत पसरवा मग त्यांना डोळे बंद करायला लावा आणि त्यांना गोल फिरत फिरू द्या. ज्या व्यक्तिला ते पहिले हात लावतील त्याला त्यांनी पकडून ठेवावे, आणि ही व्यक्ति त्यांची खेळासाठी नविन जोडीदार राहील. टिप: हे निश्चित करा की जोडी सारख्या उंचीची असावी. सुरवात व शेवटची रेषा आखा, प्रत्येक जोडीला फुगवलेला फुगा किंवा चेंडू द्या. ते पोटाच्या जवळ तो चेंडू ठेवतील, आणि एकमेकांकडे दाबत तो जागेवर ठेवतील. मग हातांचा वापर न करता ते एकमेकांभोवती फिरतील आणि शेवटच्या रेषेपर्यंत चेंडू पडू न देता किंवा फुगा फुटु न देता जातील.




## गृहपाठ 6

**तुम्हाला पुढे जे पाऊल उचलायचे आहे त्याला गोल करा: तारणासाठी येशूला विनंती करणे, बाप्तिस्म्यासाठी शरण जाणे, प्रशिक्षण घेणे, तुमच्या शिक्षकाच्या आणि पाळकाच्या अधीन काम करणे, वेळ न लावता तुमच्या आईवडीलांचे ऐकणे, इतरांकडून शिकणे. त्या पुढील पावलावर पुढील आठवडयात कृती करा.**

# संघाची निवड करणे

07



## येशू बारा शिष्यांना बोलावितो: मत्तय 4:18-22, योहान 1:35-50

### नाटक (भाग एक)

जेव्हा प्रतिनिधीला कामावर घेण्यात आले तेव्हा तो ख्रिस्ती नव्हता. येशूचे जीवन पाहत असतांना व न्याय समूहाबरोबर वेळ घालवित असतांना त्याची इच्छा आहे की त्याने ख्रिस्ती बनावे. तो येशूचे अनुसरण करत आहे हे दाखविण्यासाठी टोपी घालण्याचा निर्णय घेतो. (कागदाची विचित्र दिसणारी टोपी.) तो त्याच्या सहका-याचे पाप देखील दाखवू लागतो, विचित्र गोष्टी, जसे ते कसे चालतात किंवा कसे शिंकतात. पुढारी त्याला बाजूला घेतो आणि त्याला समजते की प्रतिनिधी येशूचे अनुसरण करू इच्छितो परंतू ते कसे करावे हे त्याला माहीत नाही. ते तयारी करतात आणि त्या दिवसाच्या त्यांच्या कामगिरीवर जातात.

### धडा 7

येशूची इच्छा होती की त्याच्या अगदी जवळ एक लहान संघ किंवा समूह असावा ज्यांना तो शिकवू शकेल आणि जे पूढे येशूने ह्या जगात असतांना काय केले हे इतरांना सांगू शकतील. येशूने काही लोकांना त्याचे अनुसरण करण्यासाठी सांगतले आणि ते त्याच्या मागे गेले.

मत्तय 4:18-22, योहान 1:35-50 वाचा

मत्तयाने जेव्हा येशूच्या बोलाविण्याला प्रतिसाद दिला व त्याच्या मागे गेला तेव्हा तो जकातदार म्हणून काम करत होता. येशूने बारा व्यक्तिंना बोलाविले ज्यांनी त्याच्या मागे जाऊन त्याला प्रतिसाद दिला. हे प्रसिध्द, श्रीमंत, सामर्थ्यशाली किंवा शिकलेले लोक नव्हते. ते राजकीय किंवा धैर्यवान पुरूष नव्हते. त्यातील बरेच साधे मासेमार होते. त्यातील कोणीच धार्मीक पुढारी असे नव्हते. परंतू जेव्हा येशूने त्यांना बोलाविले तेव्हा त्यांनी त्याचे अनुसरण केले. येशूने ही मागणी केली नाही की ते पापविरहित असावे किंवा त्यांनी कोणती परिक्षा उत्तीर्ण व्हावी किंवा कोणते वचन पाळावे. येशूने त्यांना फक्त त्याच्या मागे येऊन येशूला माहीत करून घेण्यासाठी आणि तो काय करू शकतो हे पाहण्यास सांगितले.

येशू सर्व लोकांना काय करण्यासाठी बोलावितो ते पहा: केवळ हेच की ते येशूच्या मागे जातील आणि तो काय करतो हे पाहतील. त्यांना येशूला समजून घेणे व त्याच्या बरोबर वेळ घालविणे ह्यासाठी बोलाविणे आहे.

तुम्ही येशूचे अनुसरण करणा-या समूहाचा भाग आहात काय? येशूची इच्छा आहे की तुम्ही त्याच्या गटाचा भाग व्हावे. ते रोमांचक आहे नाही का?

### पाठांतर वचन 7

योहान 8:12 पुढे येशू पुन्हा त्यांना म्हणाला, “मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणारच नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.”

### नाटक (भाग दोन)


त्यांच्या कामगिरी वरून वापस येत, ते चर्चा करतात की कशा रितीने शिष्य साधारण मनुष्य होते आणि येशूने त्यांना त्याचे अनुसरण करण्याआधी त्यांच्या बद्दल काहीही बदलायला सांगितले नाही, केवळ हे की त्यांनी त्यांचे जुने जीवन मागे सोडवे. समूह प्रतिनिधीला त्याचे जीवन येशूला देण्यासाठी प्रार्थना करण्यासाठी पुढारीपण करतो. ते त्याला प्रोत्साहित करतात की येशू कालांतराने त्याला आतून बदलत त्याच्या हृदयावर कार्य करेल.

### न्याय 7

समूहातील जीवन अधिक चांगले आहे. एखादी व्यक्ति चांगली दिसत नाही किंवा मस्त दिसत नाही ह्याची काळजी करू नका. आपण जास्त चांगले नसलो तरी येशू आपल्याला त्याच्या गटात शामील करत आहे. आपण इतरांसंबंधी तसेच करू शकतो.

### जीवनचरित्र (पाळक) 7

पाळकाचे प्राथमिक काम आहे की त्याच्या कुटुंबाची चांगली काळजी घेणे. (1 तिमथी 3:1-7) मंडळीच्या बाबतीत त्याची जवाबदारी आहे की त्याने पवित्र शास्त्राचा आणि इतर पुस्तकांचा अभ्यास सुरू ठेवावा हे त्याला अधिक चांगला पाळक होण्यासाठी, संदेशाची तयारी करण्यासाठी आणि त्याच्या मंडळीला आध्यामिक प्रौढत्वाकडे नेण्यास प्रशिक्षित करेल.




*जवाबदा-या:* त्याच्या कुटुंबाची काळजी घेणे, त्याला स्थानिक राजकारणापासून अलिप्त ठेवणे इ. त्याच्या मंडळीला वेळ देण्यासाठी वेळ असणे (2 तिमथी 2:4) आणि त्याच्या मंडळीच्या आध्यात्मिक वाढीवर लक्ष ठेवणे. देवाने त्याला किंवा तिला मंडळीवर नेमले आहे. (इफिस 4:11-12) आणि त्याने ती जवाबदारी स्वीकारावी.


*संधी:* मंडळीतील विविध कार्यासाठी लोकांना प्रशिक्षित करण्याची संधी पाळकाकडे असते. ते मंडळीच्या कार्यामध्ये वेगवेगळया भूमिका घेऊ शकतात. ज्या रितीने कोणतेही झाड योग्य परिस्थितीत वाढते तसेच मंडळी देखील वाढेल. आणि तो असे लोक शोधू शकतो ज्यांना देवाने सेवेच्या इतर पैलूसाठी बोलाविले आहे. इफिस 4:11.12 प्रेषित, संदेष्टे, पाळक आणि शिक्षक ह्यांच्या बद्दल बोलते. पाळक सर्वात चांगला सुर्वाता प्रसारक नाही, म्हणून आशी व्यक्ति ज्याला देवाने मंडळीकडे पाठविले आहे त्याला ओळखणे मंडळीच्या वाढीसाठी महत्वाचे ठरू शकते. एक पाळक उत्तम प्रेषित नसु सहक्तो म्हणून उत्तम प्रेषिताला ओळखणे आणि नविन मंडळया स्थापन करण्यासाठी त्याला नेमणे वाढीची आणखी एक किल्ली आहे. पाळक अशा 'वाईट लोकांना' ओळखू शकतात जे स्वत:ला चूकीच्या ठिकाणी टाकतात. उत्तम मेंढपाळ त्याच्या मेंढरांचे संरक्षण करतो.


## प्रश्न उत्तरं 7

1. देवाला मजबूत लोकांचा उपयोग करणे आवडते की कमजोर लोकांचा? (सहसा देवाला कमजोर लोक आवडतात ह्यासाठी की त्याने त्याचे सामर्थ्य दाखवावे. आपण जितके जास्त आध्यात्मिक रित्या गर्विष्ठ राहू तितकी देवाने आपला उपयोग करण्याची शक्यता कमी राहिल.)
2. तुमच्याकडे कोणते दानं आहेत ज्याचा उपयोग तुम्ही देवाची सेवा करण्यासाठी करू शकता? (तुमच्या विद्यार्थ्यांना चर्चा करण्यासाठी काही वेळ द्या आणि वेगवेगळे दानं व कौशल्य सांगा. विद्यार्थ्यांना एकमेकांना हसू देऊ नका किंवा जे सांगितले जात आहे त्याची टिंगल करू देऊ नका. प्रत्येक विद्यार्थ्यांला बोलण्यासाठी प्रोत्साहित करा.)
3. एकटे काम करण्यापेक्षा संघात काम करणे अधिक चांगले आहे काय? (जेव्हा मुलं त्यांचे मत देतील तेव्हा काही म्हणू शकतात की ते एकटे आहेत, परंतू तुम्ही मुलांना दाखवू शकता की संघाचे फायदे आहेत, जसे चांगले परिणाम प्राप्त करणे, कल्पनांची विभिन्नता, ते एकमेकांना प्रोत्साहित करतात इ.)
4. तुम्हाला वाटते का की येशूच्या शिष्यांना मजेचे क्षण प्राप्त झाले की त्यांच्यामध्ये सर्व काही गंभीरच होते. (त्यांना सांगा की येशू त्यांच्या मित्रासारखा होता आणि आपल्या मित्रांप्रमाणे त्यांच्यात भरवसा होता. कदाचीत त्यांनी काही विनोद सांगितले असतील किंवा त्यांच्या बरोबर घडलेल्या मजेशिर गोष्टींबद्दल ते बोलले असतील.)
5. 12 शिष्य कोण होते? (शिमोन पेत्र, आंद्रिया, याकोब, योहान, फिलिप, बार्थोलमय, थोमा, मत्तय, अल्फीचा पुत्र याकोब, थद्दय, शिमोन जिलोत, यहूदा इस्कार्येत.)

## कोड्यांची उत्तरे 7










## खेळ 7

*पिंग पौंग*

एक मुल वचनाचा पहिला शब्द बोलतो, दुसरा व्यक्ति दुसरा शब्द अशा प्रकारे. मुलं जोडीने किंवा संघात खेळू शकतात.






## गृहपाठ 7

**तुमच्या ख्रिस्ती मित्रांच्या गटात, जे येशू बद्दल आणि तो जे बोलला आणि त्याने जे केले त्या बद्दल अधिक जाणून घेत आहेत त्यात येण्यासाठी कोणातरीला आमंत्रित करा. आणखी एक मार्ग त्यांना मंडळीला येण्यासाठी गाडीत नेण्याचे आमंत्रण द्या.**

# येशू पूरवठा करतो

08



**पाण्याचा द्राक्षरस: योहान 2:1-11**

### नाटक (भाग एक)

**प्रतिनिधी अजूनही उत्साही आहे की त्याने मागील आठवडी येशूचा स्वीकार केला. तो रविवारी पहिल्यांदा चर्चला गेला, आणि सर्वांनी त्याला पुढील आठवडी येण्याचे आमंत्रण दिले. न्याय संघाच्या मुख्यालयात तो संघाबरोबर जे तो मंडळी मध्ये शिकला त्या बद्दल बोलत आहे: मंडळी मध्ये येत राहणे, त्यांनी दिलेले पवित्र शास्त्र वाचणे आणि देवाची प्रार्थना करणे. ह्या सर्व गोष्टींबद्दल उत्सुक असतांना तो संघाला विचारतो की देवाला केवळ एवढंच हवं असतं काय? काळात मागे जाऊन येशूने काय शिकविले आणि केले ते पाहण्याचा ते निर्णय घेतात.**

### धडा 8

**येशू, मरीया, आणि शिष्य एका मेजवानीत होते आणि आमंत्रण देणा-याकडे पूरेसे संसाधनं नव्हते. येशूची आई मरीया हीने समस्या पाहिली आणि तिला माहित होते की कोणाला मदत मागायची. तिने येशूला बोलाविले.**

**योहान 2:1-11 वाचा**

**येशू समस्येबद्दल काही करू शकतो हे मरीयेने ओळखले व तो काहीतरी करेल असा तिला त्याच्यावर विश्वास होता हे आश्चर्यकारक आहे.**

**हे किती चांगले आहे की चाकरांनी येशूची आज्ञा पाळली आणि रांजण काठोकाठ भरले, जवळ जवळ पूर्ण नाही, परंतू ते त्यात जितकं पाणी टाकू शकत होते तितकं त्यांनी टाकलं! ते आळशी होऊ शकले असते, केवळ अर्धे रांजण भरणारे किंवा एक त्रीतीअंश भरणारे, परंतू त्यांनी येशूच्या सूचना होईल तितक्या पाळल्या. आणि ते कुठून आले हे माहित असतांना ते मुख्य कारभा-याला वाढण्याचे धैर्य त्यांच्यात होते!**

**आपण येशूचे अनुसरण असेच केले पाहिजे. तो आपल्या जीवनात व आपल्या आजू बाजूच्या लोकांच्या जीवनात कार्य करेल अशी आपण अपेक्षा करू शकतो. आपण होईल तितकं त्याची पूर्ण आज्ञा पाळली पाहिजे, आळशी असू नये किंवा काहीही मागे राखून ठेवू नये. आणि आपण खात्री बाळगली पाहिजे की जे काही येशू पूरवितो ते उत्कृष्ट असते.**

**तुम्हाला कधी खूप गरज पडली का, आणि कोणी मदत करण्यासाठी तयार नव्हते? किंवा कोणी तरी कमीत कमी मदत केली? किंवा कधी खरी गरज होती जेव्हा कोणी तरी जे आवश्यक होते त्यापेक्षा अधीक जास्त मदत केली? जेव्हा कोणी तरी अशा प्रकारे सढळ हातांनी मदत करतं तेव्हा किती चांगले वाटते! येशू अशाच प्रकारे देतो!! लूक 6:38 मध्ये येशू म्हणतो, 'द्या म्हणजे तुम्हास दिले जाईल, चांगले माप दडपून हालवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील कारण ज्या मापाने तुम्ही मोजुन घालता त्याच मापाने तुम्हास परत घालतील.' आपण अशा प्रकारे जीवन जगले पाहिजे.**

### पाठांतर वचन 8

**लूक 6:38 "द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल; चांगले माप दाबून, हलवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील; कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला परत मापून देण्यात येईल."**

### नाटक (भाग दोन)

**कामगिरी वरून परत येऊन संघ उत्साहाने चर्चा करतो की कशा प्रकारे रांजण एका क्षणी पाण्याने भरले होते आणि नंतर द्रक्षरसाने. प्रतिनिधी आणि संघ चाकरांबद्दल बोलतात ज्यांनी रांजण काठोकाठ भरले आणि ते ह्या निष्कर्षा पर्यंत पोहचतात की त्यांनी येशूचे अनुसरण केवळ रविवारी किंवा प्रार्थनेच्या वेळेस करू नये परंतू त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण येशूला देण्याचा पूर्ण प्रयत्न करावा, जे ते शिकले ते आचारणात आणावे, ज्या रितीने ते इतरां बरोबर वागतात त्यात व जे निर्णय ते घेतात त्या बाबत. ह्याचा अर्थ काय हे त्यांना माहीत नसले तरी संघातील प्रत्येक जण पवित्र शास्त्र वाचणे आणि जे काही ते शिकू शकतात त्यासाठी मंडळीत जाणे आणि त्यांचे जीवन पूर्ण पणे देवाला देण्यासंबंधी समर्पण करतात.**

## न्याय 8

देवाची इच्छा आहे की इतरांना मदत करण्यासाठी आपला उपयोग करावा. जेव्हा आपण आज्ञाधारक आणि उदार असतो तेव्हा आपण जे सुरू केले त्याचा उपयोग करून देव त्याला जीवन बदलविणा-या गोष्टीं मध्ये वृद्धिंगत करतो.

## जीवनचरित्र (भंडारपाल) 8


**भंडारपाल**

भंडारपाल म्हणून तुम्ही कदाचीत मोठया दुकानातील मोठया संघाचा भाग असाल किंवा एखाद्या लहान दुकानात असाल. दोन्ही प्रसंगी भंडारपाल त्याच्या संभाव्य ग्राहकांच्या गरजांबद्दल जागृक आणि जेव्हा गरज आहे तेव्हा मदत करण्यास तयार असावा.

*जवाबदा-या:* भंडारपालाने दुकानाचा मालक किंवा विभाग संचालक जे सांगतो ते केले पाहिजे. ते स्थान नेहमी तुमचे आवडते नसेल, कारण दुकानाच्या गरजा ह्या जे विभाग व्यस्त असतात, कोणते लिपीक उपलब्ध आहेत, लिपीकांना कोणते कौशल्य आणि प्रशिक्षण आहे ह्यावर अवलंबून असू शकतात.

*संधी*: रोजगारा आधी किंवा रोजगारा दरम्यान काही प्रमाणात प्रशिक्षण दिले जाते, म्हणून प्रशिक्षण चांगले आहे. आणि हा चांगला सेवा रोजगार आहे, सेवा देवाच्या राज्याच्या हृदयाशी आहे, म्हणून सेवा करणे हे तुम्हाला तुमच्या जीवन भर मदत करेल. हे काम मागणी करते की तुम्ही एकदम चांगले दिसावे, भरपूर विश्रांती घ्यावी जेणे करून तुम्ही स्पष्टपणे विचार करू शकाल ग्राहकां बरोबर बोलाल आणि ह्या गोष्टी मोलवान आहेत ज्या नेहमी तुमची सुध्दा मदत करतील.

## प्रश्न उत्तरं 8




1. जर देव आपल्याला आर्शीवाद देऊ इच्छितो तर मग तो आपल्या बरोबर वाईट गोष्टी का होऊ देतो? (आपण अशा जगात राहतो ज्यात खूप पाप आहे, आणि आपल्या सर्वांसोबत कठिण गोष्टी होतात. आणि देव आपल्या शरीरापेक्षा आपल्या मनाची जास्त पर्वा करतो कारण आपला आत्मा सार्वकालिक आहे, आणि शरीर सार्वकालिक नाही. देव दुःख आणि परिस्थितीचा उपयोग आपले मन बदलण्यासाठी आणि आपली प्रौढता वाढविण्यासाठी करत असतो.)
2. तुमच्या समाजामध्ये कोणते नियम आहेत ज्यात तुम्ही जे गरजवंत आहेत त्यांना मदत करण्यासाठी जवाबदार असता? (चर्चा करा की जगातील वेगवेगळया संस्कृतीच्या समाजामध्ये कसे शांतता विषयक कायदे असतात. प्रत्येक समाजात अनेक नियम असतील. तुम्ही भिका-याला भिक द्यावी काय? जर एखादी स्त्री रस्त्यावर पडली तर लोक तिला मदत करण्यासाठी थांबतील काय? जर लहान मुल हरविले तर लोकांनी त्याला मदत करावी अशी अपेक्षा असते काय?)
3. तुम्ही कितीदा लोकांना असं म्हणतांना ऐकलं की,'ती माझी समस्या नाही' आणि ते मदत करण्यास नाकारतात किंवा ते सरळ हा निर्णय घेतात की मदतीची गरज नाही आणि ते ती करत नाही? (तुम्ही ज्या समाजात राहता तिथल्या निर्णयांची आणि केव्हा मदत करणे योग्य आहे व केव्हा अयोग्य आहे याची चर्चा तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर करा.)
4. जर देवाने तुम्हाला तुमच्या जीवनातील सर्वात महत्वाच्या गोष्टीचा त्याग करायला सांगितले तर ती कोणती असेल? (आपल्यातील ब-याच जणांसाठी ते आपले जवळचे कुटुंब असेल. परंतू देवाची इच्छा आहे की त्याने आपल्या जीवनातील सर्वप्रथम गोष्ट असावे, आणि तो आपल्याला त्याची सेवा करण्यासाठी आपल्या परिवाराबरोबरच्या जवळीकीचा त्याग करायला लावेल. तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करा की जेव्हा मिशनरी देवाचे सेवा करायला दुस-या देशात जातात तेव्हा त्यांना कसे वाटत असेल.)
5. जर तुम्ही देवाला तुमच्या जीवनातील विशिष्ट गोष्ट पूरवायला सांगितली तर ती कोणती असेल? (मुलांना त्यांचे उत्तरं देऊ द्या.)

## कोड्यांची उत्तरे 8









## खेळ 8

*बकेटकडे सर्वजण*

**वेळेआधी गोड पाणी किंवा साधे पाणी आणि स्ट्रा तयार ठेवा. प्रत्येक गट शक्य तितकं जवळ गोल तयार करेल. गटाच्या मध्ये एक भांडयात पाणी ठेवा आणि पूर्ण गट पाणी संपे पर्यंत त्यातून पितो. ते एकत्र किंवा एक एक करून ते पाणी पिऊ शकतात. जर गट मोठा असेल तर एका संघासाठी एका पेक्षा जास्त पिण्याचे भांडे ठेवा. .**






## गृहपाठ 8

**"गरज असलेल्या कोणाला तरी शोधा आणि त्यांना येशू आपल्याला जसे देतो तसे द्या, 'चांगले दाबून भरलेले माप, हालवून व शीग भरून."**

# येशू सारखी प्रिती करा

09



## चांगला शमरोनी: लूक 10:25-37

### नाटक (भाग एक)

प्रतिनिधीने विचार करणे सुरू केले आहे की त्याचे पूर्ण जीवन देवाला कसे द्यावे. मंडळीमध्ये तो शिकला की जशी आपल्यावर तशी आपल्या शेजा-यावर प्रिती करावी. तो संघाला सांगतो की तो ह्या आठवडयात कशा प्रकारे त्याच्या शेजा-याशी दयाळूपणे वागला, केवळ एका मुलाला सोडून जो त्याचा शत्रू आहे. त्यांचे कुटुंब नेहमी एकमेकांचे शत्रू होते. प्रतिनिधी विचार करतो की तो अपवाद आहे आणि त्याने त्याचे शत्रू सोडून इतर सर्वांवर प्रिती केली पाहिजे. काळात मागे जाऊन पाहण्याआधी संघ त्याच्या बरोबर असहमती दाखवितो.

### धडा 9

लूक 10:25-29 वाचा

येशूने म्हटले की, सर्वात मोठे नियम देवावर प्रिती करणे आणि आपल्या शेजा-यावर प्रिती करणे आहेत आणि ह्या दोन नियमात इतर सर्व नियम समाविष्ट आहेत.

आपण आराधना आणि त्याच्या आज्ञा पालन ह्या द्वारे देवासाठी आपली प्रिती दाखवितो. परंतू आपला शेजारी कोण आणि आपण त्याला प्रिती कशी दाखवावी?

लूक 10:30-37 वाचा

काही कारणास्तव शमरोनी आणि यहूदी लोक एकमेकांना आवडत नसत. म्हणूनच येशूने शेजा-याचे उदाहरण देण्यासाठी शमरोन्याचा उपयोग केला, यहूदयांसाठी त्याचा स्वीकार करणे कठिण असते. आणि गोष्टी मध्ये शमरोननी 'चांगला व्यक्ति' होता. शमरोन्याने त्या माणसाच्या जखमा पुसून त्याला उतार शाळेपर्यंत नेले एवढेच बरे केले असते. परंतू त्याने त्यापेक्षा अधिक केले आणि त्याने त्याचे पैसे भरले आणि सर्वकाही ठीक आहे याची खात्री करण्यासाठी परत येण्याचे आश्वासन दिले. हे आपल्यासाठी महान उदाहरण आहे, आपल्या सभोवतीच्या लोकांना उदारपणा दाखविण्याचे मार्ग शोधण्यासाठी आणि त्यांच्या बरोबर भरपूर प्रमाणात चांगले वागण्यासाठी! शेवटी येशूने ह्या पृथवीवर येऊन आपल्यासाठी मरून तेच केले.

### पाठांतर वचन 9

लूक 10:27 त्याने उत्तर दिले, "तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने व संपूर्ण बुद्धीने 'प्रीती कर;' आणि 'जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर."'

### नाटक (भाग दोन)

कामगिरी वरून परत आल्यावर प्रतिनिधी गोंधळलेला आहे. तो त्याच्या शत्रूवर प्रिती कशी करू शकतो? प्रथम हा विचार करणे फार कठिण आहे की त्याने त्याच्या बरोबर दयाळूपणे वागावे आणि दुसरे त्यासाठी काय करावे ह्याचा विचार करणे कठिण आहे. तो संघाबरोबर बोलतो जे त्याच्या शत्रूवर प्रिती करण्याचे वेगवेगळे मार्ग सांगतात. पुढारी सल्ला देतो की तो एखादी लहान गोष्ट करू शकतो, जरी त्याला ती करावीशी वाटत नसेल तरी, आणि ती केल्यावर कदाचित त्याला त्याविषयी बरं वाटेल. ते एकत्र प्रार्थना करतात आणि देवाला मागतात की त्याने त्याच्या शत्रूला एक आनंददायी दिवस देऊन आर्शीवादीत करावे. ही गोष्ट प्रतिनिधी साठी स्वीकारण्यासयोग्य अशी लहान आहे. प्रतिनिधी ठरवितो की पुढच्या वेळेस जेव्हा तो त्याच्या शत्रूला पाहिल तेव्हा तो फक्त 'हाय' म्हणेल, चांगल्या प्रतिक्रियेची अपेक्षा न करता. त्या नंतर तो वातावरण किंवा काही तरी साध्या गोष्टीबद्दल बोलेल, देवाच्या मदतीने ते ह्या पूढे शत्रू राहणार नाहीत.

### न्याय 9

आपण स्वत:वर प्रिती करतो म्हणून आपण कोणत्या प्रकारच्या गोष्टी करतो? जेवण विकत घेणे, बिल भरणे, समस्या सोडविणे. परंतू येशू आपल्याला सांगतो की जशी आपणावर तशी आपण इतरांवर प्रिती करावी. इतरांसाठी चांगल्या गोष्टी करू या.


## जीवनचरित्र (डॉक्टर) 9

डॉक्टरचे काम लोकांची मदत करणे आहे. जर हे तुमचे काम आहे तर हे माहिती असणे चांगले आहे की लोकांना बरे करण्यासाठी देवाला डॉक्टरची गरज आहे. आपल्याला माहित आहे की पवित्र शास्त्रात अनेक लोकांचे चमत्कारीक रित्या बरे होण्याचे अनेक संदर्भ आहेत, परंतू आपल्याला माहित आहे की देव लोकांना आवश्यक ते प्रशिक्षण घेण्यासाठी मदत करतो.  उदा. लूक एक वैद्य  होता आणि कादाचित ज्या ठिकाणी पौल लोकांना बरे करत होता तिथे तो वैद्य म्हणून काम करत होता.

*जवाबदा-या:* रोगाचे अचूक निदान करण्यासाठी आणि त्यावरील उपचार ठरविण्यसाठी डॉक्टरची जवाबदारी आहे की त्याने अभ्यास करावा. रोजच्या जीवनासाठी जे आरोग्य पाहिजे त्यासाठी पूर्ण समाज डॉक्टर वर अवलंबून राहतो.


*संधी:* डॉक्टर सर्व प्रकारच्या लोकांना भेटतो आणि अभ्यासातून प्राप्त केलेला आत्मविश्वास आणि डॉक्टर असणे ह्या गोष्टी त्याला सर्व लोकांना त्यांच्या जीवनाच्या चिंताजनक क्षेत्रात सल्ला देण्यासाठी मदत करतात.

## प्रश्न उत्तरं 9




1. कोणाला तरी मदत करण्यासाठी न थांबणे ह्यासाठी तुमचे सर्वसाधारण करणं कोणते असतात? (आपले सर्वसाधारण कारणं असे आहेत: पैसा, वेळ, आपल्या आईवडीलांची परवांगी, लोक काय म्हणतील ते किंवा समस्येमध्ये पडणे.)
2. आपण सर्वांचे मित्र असलो पाहिजे काय? (सर्वासोबत चांगले व मैत्रीपूर्ण राहण्यासाठी आपण प्रिती केली पाहिजे. परंतू जर कोण नेहमी वाईट वागत असेल तर आपण त्याचा मित्र असणे गरजेचे नाही. आपण आपल्या शत्रूंना प्रेम दाखवावे परंतू आपण नेहमीच त्यांचे मित्र असावे हे आवश्यक नाही.)
3. तुम्ही लोकांबरोबर उदार कसे असू शकता? (मुलांच्या प्रतिक्रिया ऐका. शमरोन्याने यहूदी माणसाची कशी मदत केली ते सांगून तुम्ही त्यांची मदत करू शकता.)
4. कोणी कधी तुमच्या बरोबर उदारपणे वागले का? (मुलांना त्याचे उत्तरं देऊ द्या.)
5. जर तुम्हाला शमरोनी दिसला असता तर तुम्ही काय केले असते? (जर मुलांची प्रतिक्रिया मदत करणे आहे तर त्यांना विचार कशा प्रकारे.)

## कोड्यांची उत्तरे 9





## खेळ 9

*ओळखा कोण*



प्रत्येक मुलासाठी खूर्ची ठेवा, त्यांना गोल करायला लावा, रंगीत कागदाचे तुकडे कापा आणि ते खूर्चीच्या मागच्या बाजूला लावा. प्रत्येक रंग कमीत कमी तिनदा खूर्चीवर लागला पाहिजे. संगीत सुरू करा आणि मुलांना खुर्च्यांभोवती चालू द्या. जेव्हा संगीत थांबेल तेव्हा मुलांनी पटकन बसावे. शिक्षकांनी रंगाचे नाव सांगावे आणि जे त्या रंगाच्या खूर्चीवर बसले आहेत त्यांनी उभे राहून पाठांतर वचन बोलावे. उदा. जर शिक्षक लाल म्हणतील तर लाल रंग लागलेल्या खूर्चीवर बसलेले सर्व जण उभे राहतील आणि एकत्र वचन म्हणतील.




## गृहपाठ 9

**ह्या आठवडी गरजू असलेल्या कोणाला तरी मदत करण्याचा मार्ग शोधा, त्यांच्यासाठी उदारपणाच्या गोष्टी करा.**

# देव ते पूरेसे करतो

10



**पाच हजारांना जेवण देणे: मत्तय 14:13-21**

### नाटक (भाग एक)

तपासक संघाच्या सदस्यांना सांगते की कशा रितीने तिने मंडळीतील एका लहान मुलाला त्याच्या आईला चिठ्ठी लिहिण्यासाठी मदत केली आणि त्या लहान मुलांने तिला मिठी मारली. तपासक म्हणते तिला नेहमी मदत करण्याची इच्छा होती परंतू ती विचार करते की ती किती मदत करू शकते. संघ तिला प्रोत्साहित करतो की तिने जे केले ते महत्वाचे होते आणि मग ते सर्व पवित्र शास्त्रातील गोष्टी साठी काळात मागे जातात.

### धडा 10

**किती पूरेसे आहे?**

**मत्तय 14:15-21 वाचा**

येशू बरोबर मोठा लोकसमुदाय होता, आणि त्यांना जेवणाची आवश्यकता होती!! येशूने शिष्यांना सांगितले की जे थोडे अन्न त्यांच्या जवळ आहे ते मोठया लोक समुदायाला वाटा.

कल्पना करा की 5 भाकरी आणि 2 मासे 5000 लोकांना वाटण्यासाठी शिष्यांना किती विश्वासाची गरज पडली असेल. प्रत्येकाला एक एक तुकडा मिळेल एवढे जेवण होते आणि शिष्यांसाठी काही उरणार नव्हते. परंतू येशूने चमत्कार केला आणि सर्वांसाठी पूरसे अन्न होते आणि 12 टोपल्या भरून जेवण उरले होते!! सर्व जण पोट भरे पर्यंत जेवले आणि शिष्यांना दुस-या दिवशी पुरेल एवढे जेवण होते. येशू केवळ सर्वांसाठी पुरेल एवढे जेवण वाढवू शकला असता, परंतू त्याने त्या ऐवजी शिष्यांजवळ जे होते ते घेतले आणि त्याला वाढविले.

आपण शिष्यांसारखे होवू शकतो. जेव्हा आपल्या जवळ जे काही थोडकं आहे ते देण्यासाठी आपण तयार असतो तेव्हा देव त्याच्या बरोबर काही तरी अविश्वसनीय करू शकतो.

केवळ अन्न व पैसा ह्या पेक्षा अधिक काही आहे, आपला वेळ व प्रयत्न सुध्दा.

### पाठांतर वचन 10

मत्तय 19:26 येशूने त्यांच्याकडे न्याहाळून पाहून म्हटले, “माणसांना हे अशक्य आहे, ‘देवाला’ तर ‘सर्व शक्य आहे’.”

### नाटक (भाग दोन)


वर्तमान काळात परत येत असतांना, तपासकाला तिच्या फोनवर मंडळीतील पुढा-याचा फोन आला. त्या लहान मुलाचे कुटुंब नुकतेच शहरात आले होते आणि मित्र मिळविण्यासाठी धडपड करत होते आणि त्यांना फार एकटे वाटत होते. ती मुलगी तिच्या आईवडीलांना त्या नविन मित्र बद्दल सांगत होती जो मंडळीत तिच्या बरोबर दयाळूपणे वागला होता, आणि त्यांना हे ऐकून बरे वाटले की ते आता ह्या शहरामध्ये एकटे राहणार नाही. आणखी एका व्यक्तिने तपासकाचा दयाळूपणा पाहिला होता आणि त्याच्याही कुटुंबाला मंडळीत आणण्याचा निर्णय घेतला होता. आणखी एका व्यक्तिने म्हटले होते की त्यांना प्रोत्साहन मिळाले आहे आणि त्यांना तिचे अनुसरण करून त्यांच्या सभोवतीच्या लोकांबरोबर दयाळूपणे वागायचे आहे. हे संदेश ऐकून तपासक देवाचे आभार मानते की त्याने तिच्या दयाळूपणाची लहान कृती त्या मुलाच्या आणि इतर अनेक लोकांच्या फायदयासाठी वाढविली.

### न्याय 10

काही गरजा पूर्ण होतील अशी कल्पना करण्यास खूप मोठया असतात. देव अशी मागणी करत नाही की आपण पूर्ण समस्या सोडवावी परंतू आपण जेवढे करू शकतो तेवढे आपण करावे आणि बाकीचे काम तो करेल.

### जीवनचरित्र (स्वयंपाकी) 10

स्वयंपाकी दररोजच्या जीवनासाठी खूप फायद्याचा ठरू शकतो. विशेष प्रसंगासाठी लोक नेहमी जेवायला बाहेर जातात. शाळेमध्ये मनोबल वाढविण्यासाठी जेवणं महत्वाची भूमिका बजावितात. खेळाडू संघ आणि सैन्य नेहमी त्यांच्या गटांना चांगले जेवण पूरविण्याचा प्रयत्न करतात, मनोबलासाठी आणि उर्जेसाठी ही.



*जबाबदा-या:* स्वयंपाक्याला त्याच्या मालकाच्या किंवा संचालकाच्या मार्गदर्शकांच्या आत राहून काम करायचे असते. जरी स्वयंपाकी काय वाढले जाईल आणि त्याची किंमत काय राहील ह्या संबंधी मर्यादित असतो तरी तो ते अधिक चांगले कसे करू शकतो ह्या बद्दल अभ्यास करू शकतो. स्वयंपाक्यासाठी स्वच्छता आणि देखावा नेहमी महत्वपूर्ण असतात.

*संधी:* स्वयंपाक्याला अन्न पदार्थ सूचीनुसार स्वयंपाक करावयाचा असतो आणि किंमत सुध्दा अंदाजपत्रकाच्या आत ठेवावी लागते परंतू कल्पकतेसाठी बरीच जागा असते. जर तुमच्या मालकाची परवांगी असली तर जे कुटुंब गरम केक मागविते त्यांना कल्पक गरम केक मिळू शकतात - फुलपाखराच्या, व्हेल इ. च्या आकाराचे. भाजीची किंवा मुख्य जेवणाची सुंदर सजावट ग्राहकांचा अनुभव अधिक चांगला करू शकते जेणे करून ते परत येतील किंवा त्यांच्या मित्रांनाही सांगतील. ह्या गोष्टी कशा कराव्या ह्यासाठी तुम्ही अभ्यास करू शकता आणि स्वयंपाकी ह्या नात्याने आपल्या व्यवसायाची बांधणी करू शकता.


## प्रश्न उत्तरं 10

1. देवाने तुमच्यासाठी पुरवठा केला अशी साक्ष तुमच्याकडे आहे काय? (ती सांगा. त्यांना एकत्र सांगण्यासाठी वेळ द्या.)
2. तुम्ही असे लोक पाहिले का की जे ख्रिस्ती नाहीत आणि त्यांच्याजवळ मालमत्ता, गाडया, कपडे आहे आणि कशाचीच कमी नाही, जेव्हा की ख्रिस्ती असूनही तुमच्या कडे त्या गोष्टींचा अभाव आहे? (कदाचित तुम्ही विचार करत असाल की देवावर अवलंबून राहणे अन्यायकारक आहे, परंतू तुम्हाला माहित असावे की ह्यातील अनेक लोकांकडे मनाची शांती नसते. कधी कधी त्यांच्या कडे प्रिती किंवा आनंदाची कमी असते, त्यांनी क्षमा केलेली नसते त्यांचा एकमेव उद्देश पैसा कमाविणे असतो. त्यांच्या हे लक्षात येत नाही की पृथ्वी तात्पूरती आहे आणि पृथ्वीवरील कोणत्याही गोष्टी पेक्षा स्वर्ग किती तरी चांगला असेल.)
3. जगात सर्वासाठी पूरेसे अन्न व पैसा का नाही आहे? (मुलांना परिस्थितीचा विचार करण्यासाठी मदत करा. कारण कदाचित देवाची इच्छा आहे की आपण एकमेकांबरोबर वाटून घेणे शिकावे. कदाचित आदामाद्वारे जगात जे पाप शिरले त्याचा ते भाग आहे.)
4. तुमचे आवडते जेवण कोणते आहे? (मुलांच्या प्रतिक्रिया ऐका.)
5. ह्या आठवडी तुम्हाला जो मदत करु शकतो अशा व्यक्तीचा विचार करा, त्याचे नाव सांगा , तुम्ही त्याची कशी मदत कराल?

## कोड्यांची उत्तरे 10






## खेळ 10

*कपांचा पिरॅमिड*

खेळाची सुरवात करण्याआधी टेबलावर कागदी कप ठेवा. (एका संघासाठी 36 कप.) दोन संघ तयार करा ज्यात एकसारखे खेळाडू असतील. दोन्ही संघाना सर्वात उंच मिनार तयार करण्यासाठी एक मिनिट मिळेल. एक मिनिट संपला की ज्या संघाचा मिनार उंच असेल तो जिंकेल.






## गृहपाठ 10

शाळेत थोडे ज्यास्तीचे जेवण आणा आणि अशा व्यक्तिला द्या जीला तुम्ही ओळखत नाही किंवा जीच्या कडे जेवण नाही.

# देवावर विश्वास असणे

11



## येशू वादळ शांत करतो: लूक 8:22-25 वाचा

### नाटक (भाग एक)

प्रतिनिधी संघाला दोन लोकांबद्दल सांगतो जे रस्त्याच्या बाजूला थांबून जो कोणी तिथून जातो त्याला त्रास देतात. आणि त्यांना त्याला त्रास देणे जास्त आवडते, दर वेळेस जेव्हा तो त्या रस्त्यावरून जातो तेव्हा त्याला भिती वाटते. बरेचदा तो पळण्याचा प्रयत्न करतो, परंतू ते त्याच्या पेक्षा मोठे असल्या कारणाने ते त्याला पकडतात आणि त्याला त्रास देतात. संघ ह्या परिस्थितीबद्दल चिंतीत आहे आणि ते म्हणतात की ते त्यासाठी प्रार्थना करतील आणि मदत करण्याच्या मार्गाचा विचार करतील. ते त्यांच्या कामगिरीसाठी काळ यंत्रात चढतात.

### धडा 11

तुम्ही कधी धोक्याच्या परिस्थितीत होता का? तुम्ही कधी घाबरले का? एक दिवस शिष्य घाबरले जेव्हा त्यांच्या समुद्रात त्यांच्या तारव्या जवळ मोठे वादळ आले.

लूक 8:22:25 वाचा

वादळाच्या मध्ये शिष्यांच्या लक्षात आले नाही की त्यांच्या सोबत कोण आहे. त्यांच्या बरोबर येशू होता ज्याच्या कडे वातावरण, वारा आणि लाटा ह्यांच्या वर पूर्ण अधिकार होता. तुम्ही तुमच्या हातात पाणी पकडून ठेवू शकता काय? ते आपल्यासाठी अशक्य आहे परंतु देव सर्व समर्थ आहे.

येशू तारवात झोपला होता तसे आपण देवावर भरवसा ठेवून विश्रांती घेवू शकतो. हे ह्यासाठी नाही की आपल्या बरोबर काही वाईट होणार नाही. तारवात असलेले सर्व शिष्य एकाला सोडून, अनेक वर्षांनंतर येशूवर विश्वास ठेवला म्हणून मारले गेले. ते खूपच वाईट आहे. परंतू काहीही झाले तरी किंवा आपण कोणत्याही परिस्थितीत असलो तरी आपण देवावर भरवसा ठेवून स्वस्थ राहू शकतो कारण सर्व गोष्टींवर त्याचे नेहमी नियंत्रण असते वाईट गोष्टींवर सुध्दा. तो कोणतीही वाईट परिस्थिती कोणत्याही वेळेस थांबवू शकतो. जर तो वाईट परिस्थिती थांबवत नाही तर, आपण भरवसा ठेवू शकतो की तो त्यातून काहीतरी चांगले करू इच्छित आहे. काहीही झाले तरी देवाने आपल्या बरोबर राहण्याचे अभिवचन दिले आहे. जेव्हा आपण वादळात असतो तेव्हा आपण जाणू शकतो की येशू आपल्या बरोबर आहे, अगदी त्या प्रमाणे जसा तो शिष्यांबरोबर तारवात होता. आणि जेव्हा आपण येशूवर विश्वास ठेवतो तेव्हा आपण सुरक्षित हातात आहोत आणि त्याच्या बरोबर स्वर्गात सार्वकालिकता घालवू. येशूने वादळ शांत केल्यावर शिष्य त्याला घाबरत होते. जेव्हा आपण लक्षात घेतो की आपला देव किती महान आणि सामर्थ्यशाली आहे आणि तो आपल्यावर खूप प्रिती करतो तेव्हा आपण इतर कोणत्याही गोष्टीला घाबरत नाही.

### पाठांतर वचन 11

अनुवाद 31:8 तुझ्यापुढे चालणारा परमेश्वरच आहे; तो तुझ्याबरोबर असेल; तो तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणारही नाही; भिऊ नकोस व कचरू नकोस."

### नाटक (भाग दोन)

कामगिरी वरून परत आल्या नंतर संघाने जे पाहिले त्यावर ते आश्चर्यचकित होते. येशू आणि शिष्यांबरोबर तारवात असणे आणि वारा आणि लाटांनी त्याचे कसे ऐकले हे स्वत: पाहिल्याने त्यांचा विश्वास भरपूर वाढला होता. प्रतिनिधी रस्त्यावरील त्रास देणा-यांचा विचार करतो आणि त्याच्या लक्षात येते की ते देवाच्या सारखे शक्तिशाली नाही. संघ त्याला प्रोत्साहन देतो की देव नेहमी त्याच्या बरोबर आहे. ज्या प्रकारे येशू तारवात झोपला होता तसेच प्रतिनिधी त्रास देणा-यांकडे आणि ते त्याला ज्या वाईट नावांनी चिडवितात त्याच्याकडे दुर्लक्ष करू शकतो कारण देव जो सर्व सृष्टी चालवितो तो त्याच्यावर प्रिती करतो. प्रतिनिधी घरी निघून जातो. थोडयाच वेळात पुढा-याला त्याचा संदेश येतो की त्याने त्रास देणा-यांकडे दुर्लक्ष केले आणि थोडया वेळाने त्यांनी त्याला एकटं सोडलं.

## न्याय 11

ज्या रितीने तुम्ही जे देवावर विश्वास ठेवता त्यांना देव कधीही सोडणार नाही व टाकणार नाही त्याच प्रकारे तो इतर लोक जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांनाही कधी सोडणार नाही व टाकणार नाही जरी ते तुमच्या बरोबर सर्व गोष्टीत सहमत नसले तरी. ज्या गोष्टींबद्दल आपण असहमत आहोत त्याच्यावर लक्ष केंद्रित करण्या ऐवजी, देव इतर लोकांच्या जीवनात कसा कार्य करत आहे ते पाहूया.

## जीवनचरित्र (आई) 11


मुलांना वाढविण्यासाठी देव ज्या मुख्य मार्गाचा उपयोग करतो त्या आई आहेत. त्या मुलाच्या जीवनाचे सर्व पैलू शिकवितात यासाठी की मूल वाढावे आणि त्याने शिकावे आणि समाजामध्ये योग्य प्रकारे शामील व्हावे. जेव्हा येशूने स्वतः ह्या पृथ्वीवर मूल म्हणून येण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याने त्याचे संगोपण करण्यासाठी विशेष पथक नेमले नाही- त्याने आईची निवड केली.

*जवाबदारी-या:* माता नवजात बालकला प्रौढ होईपर्यंत वाढवितात आणि नंतर सल्लागार म्हणून कार्य करतात. खरे आव्हान येते कारण जीवन शांतीपूर्ण, लढाईयुक्त, एका जागेवरून दुस-या जागेवर जाणारं किंवा संकटातून जाणारं असू शकतं. काहीही झाले तरी माता, माता असतातच.

*संधी:* आईची एक मुल किंवा सर्व मुलं ह्यांच्या बरोबर अद्वितीय नाते असते, त्या शिकतात की त्या कशा प्रकारच्या व्यक्तिचे संगोपण करत आहेत. हे वेगळया प्रशिक्षणाचे दार उघडते, वेगळे खेळ इ. मुलांच्या वेगवेगळया व्यक्तिमत्वांमूळे. तुम्हाला एका मुलांला जीवनात पूढे नेता येते.

## प्रश्न उत्तरं 11

1. देव आपल्यासोबत वाईट गोष्टी का घडू देतो? (देव आपल्या आत्म्याबद्दल जास्त काळजी करतो, खूप 'वाईट' गोष्टी आपल्यासाठी वाईट नसतात परंतू आपल्यासाठी चांगल्या असतात. हे लक्षात घेणे चांगले आहे की आपण अशा जगात राहतो जिथे भरपूर पाप आहे आणि देवाने सैतानाला जगात प्रवास करण्याची परवांगी दिली आहे. म्हणून मरण, लढाया, भूमिकंप, आपत्ति आहेत आणि पुष्कळ लोक वाईट गोष्टी करत आहेत आणि इतर सर्व लोकांसारखे ख्रिस्ती लोकही प्रभावित आहेत.)




2. तुम्ही कधी घाबरले का? (जर तुम्ही शिष्य वादळात होते तसे एखाद्या परिस्थितीला घाबरले असाल तर त्या बद्दल चर्चा करा. मुलांना आठवण करून द्या की जरी ते पाहू शकत नसले तरी कठिण परिस्थिती मध्ये सुध्दा देव त्यांच्या बरोबर असतो.)
3. जेव्हा कठीण वेळ आली, आणि तुम्ही प्रयत्न करणं सोडून देणार होते आणि देवाला सोडणार होते तेव्हा तुम्ही कशा प्रकारे खंबीर असे उभे राहीले? (आपल्या जीवनात मोह आणि कठिण क्षण येतात आणि तुम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे की तुम्ही एकटे नाही आणि तुम्ही तुमच्या जीवनातील सर्व काही सोडविण्यासाठी स्वयंपूर्ण नाही. शिष्य मोठया वादळाला घाबरले, परंतू येशूने वादळाला शांतीने शांत केले. तसेच तुमच्याही जीवनात कठिण गोष्टी असतील परंतू जेव्हा येशू तुमच्या जीवनात आहे तेव्हा आपल्याला माहीत आहे की शांती येईल.)
4. तुम्हाला कोणत्या प्राण्याची भिती वाटते? (एकमेकांच्या प्रतिक्रिया ऐका.)
5. तुमच्या मनामध्ये धैर्य विकसित करण्यासाठी व त्याचा वापर करण्यासाठी तुम्ही कोणत्या गोष्टी करू शकता? (उत्तरं सूचविण्याआधी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या कल्पनांचा विचार करू द्या. काही कल्पना ह्या असाव्या की त्यांचा विश्वास लोकांबरोबर हळू हळू वाटण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे. देवाची सेवा करण्यासाठी भिती वाटली तरी कोणत्याही संधीचा स्वीकार करणे. धैर्याकडे नेणा-या विश्वासाची रचना करण्यासाठी तुम्ही पवित्र शास्त्र वाचन, प्रार्थना, देवाची स्तुती करणे इतरांच्या साक्षी ऐकणे आणि लिहिणे किंवा देवाने तुमच्या जीवनात काय केले ते लक्षात ठेवणे ह्यात तुम्ही वेळ घालवू शकता.)


## कोड्यांची उत्तरे 11





## खेळ 11



*जर..... तर पाठांतर वचन बोला*

**जर ..... तुम्ही सकाळी सर्वात आधी नाश्ता केला असेल तर, तुम्ही काल रात्री आंघोळ केली असेल तर, तुमचे डोळे कथ्थे असतील तर, तुम्हाला कोबी आवडत असेल तर, तुम्ही बिछाना घडी केला असेल तर, तुम्हाला बहिण असेल तर, तुमचे कपडे लाल असतील इ. तर पाठांतर वचन बोला. मुलांना पाठांतर वचन पाठ करण्यासाठी मदत करण्यास वचनाची पुनरावृत्ती करण्याचा हा सोपा मार्ग आहे.**




## गृहपाठ 11

**भितीदायक किंवा कठीण गोष्ट करणा-या कोणला तरी शोधा आणि स्वइच्छेने त्यांच्या सोबत जा.**

# येशू कोण आहे? 12



**तुम्ही मला कोण म्हणून म्हणता? मत्तय 16:13-20**

### नाटक (भाग एक)

ह्या आठवडयात तपासक गोंधळलेली आहे. ती अशा कोणातरीला भेटली जो खूप दयाळू, नम्र होता आणि खूप आनंदीत दिसत होता परंतू तो दुस-या धर्माचे पालन करत होता. ती गोंधळलेली आहे कारण धर्माच्या फरका शिवाय ही व्यक्ति एखाद्या ख्रिस्त व्यक्ति सारखीच दिसत होती. तिने तिचा गोंधळ पुढारी आणि प्रतिनिधी ह्यांना सांगितला की ख्रिस्तीपणा वेगळा कसा आहे. पुढारी कामगिरीवर जाण्याआधी उत्तर न देण्याचा प्रयत्न करतो ज्या काळात ते मागे जात आहेत त्या कारणास्तव. ते काळ यंत्रात चढतात आणि येशू व त्याच्या शिष्यांना पाहण्यासाठी जातात.

### धडा 12

यहूदी लोक सामर्थ्यशाली लोक होते परंतू त्यांच्यावर विजय प्राप्त केला गेला होता आणि ते सर्वत्र पसरले होते आणि त्यांची सर्व संपत्ति लुटल्या गेली होती. परंतू देवाने अभिवचन दिले होते की त्यांची मदत करण्यासाठी कोणी तरी येईल आणि त्या व्यक्तिला मसिहा म्हणतील. सहाजिकच यहुदी लोक बलाढय योध्दयाची वाट पाहत होते जो आक्रमणकर्त्यांना त्यांच्या देशातून पळवून लावेल. परंतू येशू त्यापेक्षा अधिक असे करण्यासाठी आला होता. त्यांचा देश व त्यांची संपत्ति वाचविण्या ऐवजी तो त्यांचे ह्रदय तारण्यासाठी आला होता.

मत्तय 16:13-20 वाचा

लोक म्हणत होते की येशू संदेष्टा आहे. येशूने त्याच्या शिष्यांना विचारले की त्यांना काय वाटते की तो कोण आहे. पेत्राने बरोबर उत्तर दिले की येशू मसीहा, जीवंत देवाचा पुत्र आणि इस्त्राएलाचा सोडविणारा आहे! येशूने ह्या विधानाला प्रतिक्रिया दिली की ते खडक आहे आणि नविन मंडळीचा पाया आहे. तुमच्यासाठी येशू कोण आहे? तो पवित्र शास्त्रातील कोणीतरी आहे, कादाचीत संदेष्टा किंवा महान शिक्षक? की तो देवाचा पुत्र आहे जो तुम्हाला तुमच्या पापापासून सोडविण्यासाठी आणि नविन विपुलतेचं जीवन देण्यासाठी ह्या पृथ्वीवर आला?

योहान 3:16 सांगते की 'देवाने जगावर एवढी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला ह्यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.' येशूची इच्छा आहे की तो कोण आहे हे आपण समजून घ्यावे आणि त्याच्या वर विश्वास ठेवावा जेणे करू तो तुम्हाला सर्वात उत्तम गोष्ट देवू शकेल!

### पाठांतर वचन 12

योहान 3:16 देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

### नाटक (भाग दोन)

ते कामगिरी वरून परत येतात. तपासक संघासोबत जे त्यांनी आता पाहिले त्याची चर्चा करते. तीच्या लक्षात येते की धर्मांमधील फरक येशू आहे, की तो देवाचा पुत्र आहे आणि तो आपल्यासाठी मरण पावला, आणि तोच केवळ स्वर्गात जाण्याचा व ख-या देवाबरोबर सर्वकालसाठी राहण्याचा मार्ग आहे. ती निर्णय घेते की ज्या व्यक्तिला ती नुकतीच भेटली होती त्याला येशू बद्दल सांगण्याची संधी ती पाहिल, कारण जरी बाहेरून सर्वकाही चांगले दिसत असेल तरी तारण प्राप्त करण्यासाठी त्याला येशूची गरज आहे.

### न्याय 12

योहान 3:16 देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.


### जीवनचरित्र (रविवार शाळा शिक्षक) 12

रविवार शाळा शिक्षक अशी व्यक्ति आहे ज्याची निवड पाळक किंवा मंडळीचे प्रशासन करते ह्यासाठी की मुलांनी त्यांच्या विश्वासात वाढण्यासाठी त्यांना ज्या महत्वाच्या माहितीची गरत आहे ते शिकविण्यासाठी त्यांनी मदत करावी.

*जवाबदा-या:* रविवार शाळा शिक्षकाने वर्गाची रचना कशी हाताळावी ते समजले व शिकले पाहीजे, शिकविण्याचे व हस्तकृतीचे साहित्य विद्यार्थ्यांसाठी तयार ठेवावे, आणि रविवार शाळेचे कार्य सुरळीत होण्यासाठी इतर शिक्षकांबरोबर समन्वय साधावा.

*संधी:* रविवार शाळेच्या शिक्षकांनी हे ओळखणे शिकले पाहिजे  की विद्यार्थी आत्मिक रित्या कुठे आहेत आणि त्यांची शिकविण्याची शैली आणि किंवा शिकवियाचा आशय त्याची वाढ करणारा असेल हे पहावे. शिक्षक विद्यार्थ्यांसाठी दृष्टांत मांडू शकतात- विद्यार्थ्यांना हे पाहण्यासाठी मदत करण्यासाठी की आज साधे पाउलं उचलण्याने ते भविष्यात किती उत्तम परिणाम पाहू शकतात. काही प्रसंगी, धर्मनिरपेक्ष शाळा त्यांच्या शाळेत धार्मिक शिक्षणाची परवांगी देत नाहीत, म्हणून रविवार शाळा शिक्षक ती जागा भारून काढू शकतात आणि परिणामी मुलांना शिक्षण मिळेल.


## प्रश्न उत्तरं 12




1. तुम्ही भविष्यात देवाची सेवा कशी करू इच्छिता? ह्या विषयावर चर्चा करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्या. लक्षात ठेवा की देव प्रत्येकाला वेगवेगळे दानं देतो, आणि ख्रिस्ताच्या शरीराचा हात हा डोळया पेक्षा अधिक चांगला नाही आणि तसेच डोळा हाता पेक्षा चांगला नाही.)
2. तुम्ही येशू बद्दल जो विश्वास ठेवता तो कुठुन आला? परंमपरेतून, संदेशकर्ता किंवा शिक्षक जे बोलतात त्यातून की देवाबरोबर तुमच्या वयैक्तिक अनुभवाद्वारे? (दुर्दैवाने मंडळीतील अनेक मुलं म्हणतात की ते देवावर विश्वास ठेवतात, परंतू ह्या मूळे नाही की त्यांना येशू ख्रिस्ताबरोबर वयैक्तिक अनुभव प्राप्त झाला. मंडळीमध्ये ख्रिस्ती व आध्यात्मिक असणं सोपं आहे, जेव्हा तुम्ही तुमच्या सारखेच वागणा-या लोकांच्या मध्ये असता तेव्हा (परंपरा) परंतू रस्त्यांवर, कामावर आणि जिथं कुठं तुम्ही जाता ह्या जागांवर देव आपल्याला आपल्या जीवनाचे सर्वात मोठे धडे देत असतो. त्या ठिकाणी आपण येशूला वयैक्तिक  रित्या समजू शकतो.)
3. तुम्ही वयैक्तिक रित्या येशू बद्दल काय विश्वास ठेवता? (सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की तुम्ही विश्वास ठेवावा की तो तुमचा तारणारा आहे, की तुम्ही वयैक्तिक रित्या त्याला ओळखता केवळ मंडळी मध्ये तो जसा दिसावा तसे नाही.)
4. आपण येशू बद्दल अधिक कुठे जाणून घेऊ शकतो? (आपण बरेचदा विचार करतो मंडळीमध्ये, परंतू तुम्ही येशू बद्दल सर्वात जास्त त्याचे वचन वाचून आणि त्याच्या बरोबर वयैक्तिक अनुभव घेऊन शिकू शकता. वाचन आणि आज्ञा पालन ह्याचा परिणाम खोलवर समज होतो, ज्यामूळे देवासाठी आधिक प्रिती निर्माण होते ज्यामूळे आधिक वाचन आणि आज्ञा पालन असे वरील आवर्तण निर्माण होते.)
5. जर तुम्ही येशूला तुमच्या जीवनाबद्दल काही विचारू शकले असते तर तुम्ही काय विचारले असते? (लक्षात ठेवा येशूला आपल्या बद्दल सर्व काही माहीत आहे. कधी कधी आपल्याला आपल्या जीवनाबद्दल किंवा काही गोष्टी का घडतात ह्याबद्दल संशय असतात. मुलांना त्यांची उत्तरं सांगू द्या. त्यांना आठवण करून द्या की देव त्यांचे ऐकू शकतो आणि त्यांच्या प्रश्नाचे उत्तरं विविध प्रकारे देऊ शकतो.)

## कोड्यांची उत्तरे 12










## खेळ 12

*मग्गा फुगा*

खेळ सुरू करण्याआधी टेबलाच्या काठावर एका ओळीत प्लास्टिकचे 15 कप ठेवले जातात. जेव्हा घडयाळ सुरू होते तेव्हा खेळाडू कडे फुगा फुगवून त्या फुग्यातल्या हवेचा उपयोग करून ते कप टेबलावरून खाली पाडण्यासाठी 60 सेकंद असतात. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी फुगा कितीही वेळेस फुगवला जाऊ शकतो. जर टेबलावर एकही कप उरला असेल तर खेळाडू हारतो आणि दुस-या खेळाडूला संधी मिळते. तुम्ही दोन संघ करू शकता जसे मुलांविरूध्द मुली आणि प्रत्येक संघाच्या एका स्वयंसेवकाला सारख्याच वेळी खेळायला सांगू शकता आणि पाहा की कोण सर्वात आधी सर्व फुगे खाली पाडतो.






## गृहपाठ 12

अशी व्यक्ति निवडा जीला येशूला जाणण्याची गरज आहे आणि तुम्ही इतर कुठल्यातरी गोष्टीसाठी जो वेळ वापरू इच्छित होता त्याचा त्याग करा व त्या वेळेस त्यांच्यासाठी दररोज प्रार्थना करा. मग त्यांच्या साठी लहानसे बक्षिस विकत घ्या व त्यांना द्या. येशू बद्दल त्यांना सांगा आणि त्यांना रविवार शाळेत आमंत्रित करा.

# येशू सामर्थ्य प्रदर्शित करतो. 13



## लाजर: योहान 11:32-44

### नाटक (भाग एक)

प्रतिनिधी संघाला सांगतो की त्याचा कालचा दिवस विचित्र होता. सर्व काही चूकीचं होत होतं, जेवण जमीनीवर सांडणे, त्याच्या कागदांवर जूस सांडणे, त्याच्या डोक्याला लागले.... तो कागदं आणण्यासाठी दुकानात जात होता आणि जोराचा पाऊस येऊ लागला आणि तो जवळच्या दुकानात शिरला. पाय-यांवर त्याला ठोकर लागली आणि त्याची डाव्या पायातली चप्पल तुटली. जणू काही तो सर्वात वाईट दिवस होता. तेव्हाच जो त्याचा शत्रू ज्याच्या बद्दल तो काही आठवडयांपूर्वी बोलत होता तो त्या दुकानात आला आणि त्याची उजव्या पायातली चप्पल तुटली! प्रतिनिधी ने पाहिले की त्याचीही चप्पल प्रतिनिधीच्या चप्पल सारखीच होती, म्हणून त्याने त्याची चांगली चप्पल त्या दुस-या मुलाला दिली. अश्चर्यचकित झालेल्या मुलाने ती चप्पल घेतली आणि मग तो प्रश्न विचारू लागला. शेवटी ते देवा बद्दल बोलले. जरी प्रतिनिधीला जास्त काही माहीत नव्हते तरी त्याने त्याला येशू बद्दल सांगण्याचा उत्तम प्रयत्न केला. पाऊस थांबल्या नंतर प्रतिनिधीकडे चप्पल नव्हती आणि त्याचे डोके दुखत होते आणि त्याला अजुनही कागद विकत घ्याचा होता. परंतू हे सर्व असून सुध्दा तो आत मध्ये आनंदी होता. येशूला पाहण्यासाठी मागील काळात जात असतांना संघ ह्या गोष्टीवर आश्चर्य व्यक्त करत होता.

### धडा 13

येशूचे काही मित्र होते, लाजर आणि त्याच्या दोन बहिणी मरीया आणि मार्था. परंतू लाजर आजारी पडला आणि मरण पावला. येशू कुटुंबाला भेटण्यासाठी बेथानीला गेला जिथं लाजाराला कबरेत ठेवले होते.

**योहान 11:32-44**

दोन्ही बहीणींचा विश्वास होता की जर येशू लवकर आला असता तर लाजर जिवंत असता. येशूने जसे ह्या आधी अनेक लोकांना बरे केले तसे लाजाराला कसे बरे केले पाहिजे ह्या बद्दल त्यांच्या मनात योजना होत्या. परंतू येशूकडे अधिक चांगली योजना होती.

येशूने अनेक आजा-यांना बरे केले होते ह्यासाठी की जगाला दाखवावे की त्याला आजारावर अधिकार होता आणि आता येशू जगाला हे दाखविणार होता की त्याला मरणावर सुध्दा अधिकार आहे!!! चमत्कार होण्या आधी मार्था म्हणाली की आता लाजराच्या शरीराचा दुर्गंध येत असेल. ती अजूनही विश्वास ठेवत नव्हती. परंतू नंतर येशूने लाजराला हाक मारली आणि तो कबरेतून चालत बाहेर आला!!! उत्सव करण्याचा किती मोठा दिवस तो होता!

देव सहसा अशा प्रकारे कार्य करतो ज्याची आपण अपेक्षा करत नाही. त्याच्या मार्गाने त्याचे कार्य होवू देण्यासाठी आपण खुले असले पाहिजे. आपण आपल्या जीवनामध्ये देवाला काहीतरी करतांना पाहिले म्हणून त्याचा अर्थ हा नाही की तो दुस-यांच्या जीवनातही अगदी तसेच कार्य करेल. परंतू देव जे काही करण्याचा किंवा न करण्याचा निर्णय घेतो, आपण सर्व गोष्टीवर त्याला आधिकार आहे ह्यावर भरवसा ठेवू शकतो आणि येशूवर विश्वास ठेवून आपल्याला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.

### पाठांतर वचन 13


योहान 11:25 येशूने तिला म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल;

### नाटक (भाग दोन) 13

कामगिरी वरून परत आल्यावर त्यांनी चर्चा केली की कशा प्रकारे येशू आपण कल्पना करू शकत नाही अशा रितीने कार्य करतो, जसे प्रतिनिधीचा वाईट दिवस त्याने त्याच्या शत्रूला देवाबद्दल सांगण्याच्या संधीत बदलला. प्रतिनिधी त्यांना सांगतो की ह्या पूढे त्यांनी त्याला त्याचा शत्रू म्हणू नये कारण तो आता त्याला शत्रू समजत नाही. आता ते मित्र आहेत.

### न्याय 13

लोकांची मदत करण्यासाठी देव आपल्या द्वारे कार्य करू इच्छितो. देवाच्या इच्छिप्रमाणे त्याला कार्य करू देण्यासाठी आपण खुले असूया.



## जीवनचरित्र (कचराउचलणारा) 13

**कचरा उचलणारा शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आणि आजार पसरविणा-या प्राण्यांना दुर ठेवण्यासाठी काम करतो. त्याला नेहमी लोकांबरोबर काम करावे लागते: तो ज्या दलाचा भाग आहे व शहरातील लोकांसोबत. कामाचे तास लांब असू शकतात आणि रात्री उशीरा पर्यंत किंवा शनिवार रविवारी सुध्दा कामाची गरज लागू शकते.**


*जवाबदा-या:* **कचरा उचलणारा शहरासाठी किंवा शहराने नेमलेल्या कंपनीसाठी काम करतो. वेळेवर येणे आणि घडयाळाच्या वेळेनुसार घरी न जाता काम संपल्यावर घरी जाणे महत्वाचे असते. त्याच्या दलातील लोकांना त्याने योग्य वागणूक दिली पाहिजे आणि शहरातील लोकांबरोबर मिळून मिसळून वागले पाहिजे.**


*संधी:* **कचरा उचलणारा शहरात सर्वांना भेटणार म्हणून त्याच्या कडे जे गरजवंत आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करण्याची, जे दुःखी व निराश त्यांना प्रोत्साहित करण्याची, संधी असते. ह्यात त्याच्या दलातील सदस्यांचा समावेश आहे. जेव्हा संधी आहे तेव्हा आणि जेव्हा त्याला त्याचे काम सोडावे लागणार नाही तेव्हा तो जास्त प्रमाणात काम करू शकतो.**


## प्रश्न उत्तरं 13

1. **देव करू शकत नाही अशा गोष्टी आहेत का? (नाही पवित्र शास्त्र सांगते की काळाच्या सुरवातीपासून आज पर्यंत आणि भविष्यातही देव सर्व समर्थ आहे, सर्व काही पाहू शकतो, सर्व समजू शकतो. देवाला सर्वकाही शक्य आहे.)**
2. **तुम्ही कधी चमत्कार पाहिला का? (तुमच्या विद्यार्थ्यांनी पाहिलेल्या विविध चमत्कारांबद्दल चर्चा करण्यासाठी त्यांना वेळ द्या, लहान किंवा मोठे. जर तुमच्याकडे वयैक्तिक साक्ष असेल तर सांगा. हे चमत्कार संधी असू शकतात, कोणीतरी त्याचे मन उघडण्यासाठी, बरे होण्यासाठी, त्यांची वृत्ती बदलण्यासाठी किंवा देवाने संरक्षण करण्यासाठी.)**
3. **देवाने मला का निर्माण केले? (देवाच्या प्रिती बद्दल, त्याची सेवा करण्याच्या पर्यायाबद्दल, आणि देव तुमच्या बद्दल सर्व काही कसे जाणतो तुमचे दानं, तुमच्या आवडी निवडी तुमचा राग सर्व काही, या विषयी बोला.)**
4. **येशूने लाजराला बरे कल्यावर तो कसा दिसत असेल असे तुम्हाला वाटते? (आनंदी, आश्चर्यचकित, थकलेला, वेगवेगळे उत्तरं द्या आणि मुलांना सांगू द्या की त्यांना काय वाटते की लाजराला कसे वाटले असेल.)**
5. **देवाने तुमच्या जीवनाचा कसा वापर केल्यास तुम्हाला आवडेल? (मुलांना सांगू द्या की त्यांना काय आवडेल, कदाचीत संदेशकर्ता, संगीतकार, मिशनरी, शिक्षक इ.)**

## कोड्यांची उत्तरे 13





## खेळ 13

*बास्केटबॉल*

**तुमच्या पाठांतर वचनाचा प्रत्येक शब्द कागदाच्या तुकडयावर लिहा आणि त्याचा चेंडू तयार करा. वर्गाला संघात विभागा आणि प्रत्येक संघासाठी पाठांतर वचनाचा आपआपला संच राहील इतके पूरेसे ‘चेंडू’ तयार करा. संघ बास्केट मध्ये त्यांचे चेंडू फेकण्यासाठी स्पर्धा करतात. ज्या संघाचे आधी संपेल तो जिंकेल, मग ते कागदांसह पाठांतर वचन म्हणतील आणि पुन्हा खेळतील.**






## गृहपाठ 13

तुमच्या शेजा-याला मदत करण्यासाठी तुम्ही कोणते काम करू शकता हे देवाने तुम्हाला दाखवावे म्हणून त्याला विनंती करा आणि तुमच्या शेजा-याला विचारा की तुम्ही त्यांच्या साठी ते काम करण्याची योग्य वेळ कोणती आहे आणि ते काम त्यांच्यासाठी करा.



www.childrenareimportant.com
info@ChildrenAreImportant.com

Equip & Grow